Adelaide Marathi Mandal

Incorporation No. A40023

ऍडलेड मराठी मंडळ

अनुक्रमणिका

संपादकीय......2
मकर संक्रांत......3
सावर......6
पंगत......7
महाराष्ट्राची खाद्यभ्रमंती......8
ऑस्ट्रेलियन डायरेक्टर्स गिल्ड अवॉर्ड्स......0
छंद नाणी संग्रहाचा......2
जन्मदाता......4
World and God......1
मैत्रीण......6
गुरू......1
कशासाठी ? पोटासाठी......3
भारतरत्न पं भीमसेन जोशी......5
योगा......6
सी.रामचंद्र......9
जपान भेट......11
आपण सर्वच सांगाती......13
माझा मित्र – राम......17
राग-संगीताच्या दुनियेत डोकावताना......19
विश्वास सोहोनी नाट्य महोत्सव......21
लिमये काका......22

संपादकीय

नमस्कार वाचकहो,

मृदगन्धचा गुढीपाडवा २०२० - मराठी नववर्ष विशेषांक तुमच्या सर्वांच्या हाती देताना (म्हणजे तुमच्या डिव्हाईस वर डाउनलोड साठी उपलब्ध करून देताना) मला खूप आनंद होतोय. इथे ऑस्ट्रेलियात राहून ह्या अंकाच्या निमित्ताने मला आणि ऑस्ट्रेलियातील हुन्नरी लेखकांना आपापले लेखन सर्वांसोबत शेअर करता येतंय, आणि आपल्याला घरबसल्या वाचायला मिळतंय हे ह्या उपक्रमाचे मोठे यश आहे.

ह्या अंकाचे अजून एक वैशिष्ट्य म्हणजे ह्यावेळी प्रथमच एका युनी स्टुडन्टचे लेखन येतआहे. त्यासोबतच ह्यावेळी अंकाच्या लेखकवर्गात मेलबर्नमधील मंडळीही सहभागी झाली आहेत. एव्हढचं नव्हे तर माझ्या विनंतीवरून ब्रिस्बेनस्थित गायक श्री.रघुनाथ पवार ह्यांनी वेळात वेळ काढून पुण्यातील प्रख्यात शास्त्रीय गायिका डॉ. अपर्णा गुरव (विदुषी स्व.वीणा सहस्त्रबुद्धे ह्यांच्या शिष्या) ह्यांच्याकडून एकलेख घेऊन आणि त्याचे मराठी टायपिंग करून दिला. अपर्णाताईआणि रघुनाथदादांचे त्यांनी दाखवलेल्या आपुलकीबद्दल मनापासून आभार. ह्या अंकाला अर्थातच आपल्या एडलेडमधील लेखकमंडळींनीही मनापासून पाठींबा दिला आणि त्या बळावरच मृदगन्ध इथवर आले आहे.

ह्यानिमित्ताने मी मंडळाच्या -आजी माजी सर्व लेखकांचेआभार मानतो आणि ह्यापुढेही त्यांच्याकडून अंकाला साहित्य मिळत राहील अशी आशा करतो.

ह्याअंकाची मांडणी आणि सजावट पराग विश्वासराव ह्यांनी केली आहे त्याबाबत त्यांचेही मनापासूनआभार.

विविध विषयांवरील विविध लेखकांकडून सजलेला हाअंक तुम्हा सर्वांना आवडेल अशी आशा आहे. तुमचे अभिप्राय, सूचना, अथवा अंकासाठी मदत करायची असल्यास adelaidemm@gmail.com ला ईमेल करून अवश्य कळवा.

कळावे

आपला स्नेहेच्छु

श्री.अभिजित मोहोळकर

संपादक

मकर संक्रांत

मकर संक्रांतीच्या शुभ दिनी सर्वाना शुभेच्छा

गुढी पाडवा हा आपल्या नवीन वर्षाचा प्रथम सण असतो , तरी पण नव्या वर्षाचा सर्व प्रथम सण हा बहुमान संक्रांतीचाच . इंग्रजी कॅलेंडर प्रमाणे जानेवारी व मराठी पौष महिन्यातील हा सण . पौष महिन्यात फारसे सण नसतात , ह्याला भाकडमास म्हणतात, परंतु संक्रांत हा एकच सण , जो सर्वाना आनंद देतो , पौष महिन्यात येतो. आपले सर्व सण चंद्राच्या भ्रमणावर आधारित असतात , पण मकर संक्रांत हा एकच सण सूर्यावर आधारित आहे . दिवाळी , दसरा ह्या सणांच्या तारखा त्यामुळे बदलतात , पण संक्रांत मात्र ठराविक दिवशीच येते .

सूर्य एका राशीतून दुसऱ्या राशीत जाणे , ह्याला संक्रमण म्हणतात . हया दिवशी सूर्याचे मकर राशीत संक्रमण होते .ह्यावरून ह्या दिवसाला मकर संक्रांत हे नाव मिळाले .संकरासूर व किंकरासूर अशा दोन राक्षसांना देवीने संक्रांतीच्या दिवशी व पुढील दिवशी मारले , म्हणूनही ह्या दिवसांना संक्रांत व किंक्रांत अशी नवे पडली .संक्रांतीच्या आधीच्या दिवसाला भोगी म्हणतात .

संक्रांत १४ किंवा १५ जानेवारीला येते . पृथ्वीच्या सूर्या भोवतीच्या भ्रमणामुळे पडणारा फरक भरून काढण्यासाठी दर ८० वर्षांनी संक्रांतीचा दिवस १ दिवसाने पुढे ढकलला जातो .हल्ली १४ जानेवारीला संक्रांत येते . आपल्याकडे कधीकधी तिथीचा क्षय होतो . आपल्या कालगणनेत तिथीच्या क्षयामुळे होणारा अनुशेष भरून काढण्यासाठी संक्रांत हि कधीकधी १५ जानेवारीला येते. ह्या दिवशी दक्षिणायन संपून उत्तरायण सुरु होते असे म्हणतात , पण खरं म्हणजे ते बरोबर नाही , उत्तरायणात दिवस तिळातिळाने मोठा व्हायला लागतो . खरं म्हणजे २१ डिसेंबर हा सर्वात लहान दिवस असतो (उत्तर गोलार्धात) , त्यामुळे उत्तरायण तेव्हा , म्हणजे २१ डिसेंबर ला सुरु होते . अगदी पूर्वी , २००० वर्षांपूर्वी याच दिवशी संक्रांत असे , १००० वर्षांपूर्वी ३१ डिसेंबर ला असत असे , तसेच अजून ५००० वर्षानंतर संक्रांत फेब्रुवारी अखेर व ९००० वर्षांनंतर जून मध्ये असेल .१७५२ साली संक्रांत १ जानेवारीला असे .

पृथ्वी कललेली असल्यामुळे , पृथ्वीचा उत्तर गोलार्ध जेव्हा सूर्याकडे येतो , तेव्हा उत्तरायण सुरु होते व दिवस मोठा व्हायला लागतो , त्यामुळे २१ डिसेम्बरला उत्तरायण सुरु होते व सूर्या मकर राशीत येतो , तो दिवस म्हणजे संक्रांत.

हा सण संबंध भारत वर्षात साजरा केले जातो . वेगवेगळ्या प्रांतात नाव व साजरा करण्याची पद्धती निराळ्या आहेत . पंजाब मध्ये ह्याला लोरी म्हणतात , उत्तर प्रदेशात किचिन व किचोरी , तामिळनाडूमध्ये पोंगल , मध्य प्रदेश व बुंदेलखंडात सुकरत किंवा सकरत , तर आसाममधे माघ बिहू म्हणतात .केरळ मधे माघारा valaku , आंध्र प्रदेशात पेड्डा पांडूग असे म्हणतात

गुजराथ मधे ह्या वेळेला रंगी बेरंगी पतंग उडवायची मजा असते , आणि आकाश सुंदर सुंदर पतंगांनी सजलेले दिसते .

आपल्या महाराष्ट्रात सुवासिनी स्त्रिया हळदीकुंकूवाचा कार्यक्रम करून एकत्र जमतात . एकमेकींना वाण देतात , लहान थोर एकमेकांना तिळगुळ , हलवा देऊन , गोडगोड बोलण्याबद्दल आवाहन करतात . रथसप्तमी पर्यंत हा तिळगुळ व हळदीकुंकूवाचा कार्यक्रम चालतो .

तिळाचे दान , तीळ लावून स्नान , तिळाचे सेवन व तिळगुळ , हे ह्या सणाचे वैशिष्ठ्य आहे

संक्रांत सांगते -- सारे रोग , द्वेष , मत्सर संपवा . एकमेकांशी गॉड बोला .मनामनाचे स्नेहमिलन घडवा .आपले अंतःकरण तिळासारखे स्नेहपूर्ण . स्निग्ध व वाणी गुळासारखी गोड ठेवावी . परस्परांमध्ये प्रेम , सर्वांविषयी जिव्हाळा , आपुलकी वाटावी व जुनी भांडणे विसरून जावीत .अशा सद्भावनेने तिळगुळ द्यावा व घ्यावा . संक्रांत म्हणजे , स्नेहवर्धनाचा गोड संदेश घेऊन , जीवनांत गोडवा वाढवणारा , पवित्र सण आहे

सुगडी , म्हणजे मातीची बोळकी , छोटी मडकी आणून , त्यांना हळद कुंकवाची बोटं लावतात .त्यात गाजर , हरभरे , शेंगा , धान्य भरून , त्यांचे पूजन करून , सुवासिनींना देतात . हळदीकुंकू करून मैत्रिणींना काही वस्तू वाण म्हणून देतात . असात्त्विक वस्तू वाण म्हणून देऊ नये . असात्त्विक वस्तूंमुळे २ व्यक्तींमध्ये देवाण - घेवाण संबंध निर्माण होण्याची शक्यता वाढते. सात्विक वस्तू , म्हणजे जपमाळ , देवांचे फोटो , उदबत्तीचे पुडे वाण दिल्याने , देताना ईश्वराचा प्रसाद ,असा भाव निर्माण होतो व देणार्याला , तसेच घेणाऱ्याला सात्विक आनंद प्राप्त होतो .

संक्रांतीला देवता मानलेले आहे . याच देवीने संकरासुराचा वध केला . संक्रांति देवी दर वर्षी निरनिराळ्या वाहनावरून येते . तिची निरनिराळ्या गोष्टींवर दृष्टी पडते व त्याचे दुर्भिक्ष होते . ह्या दिवशी संक्रांति देवीची पूजा करतात . सूर्याच्या गतीचे प्रतीक , म्हणून हिला शक्ती देवता मानतात . पाटावर लाल वस्त्र घालून , त्यावर तांदुळाचे कमल काढून , त्यावर सूर्या नारायणाची मूर्ती स्थापून तिची पूजा करतात.ह्या काळात उत्तरायण असते . उत्तरायणात आलेले मरण चांगले समजतात , कारण यमलोकात जायची शक्यता कमी असते . म्हणूनच पितामह भीष्माचार्य , ह्यांना , इच्छामरण असल्यामुळे , उत्तरायण सुरु झाल्यावरच त्यांनी प्राण सोडला .

पुराणातल्या गोष्टीप्रमाणे -- सूर्य ह्या दिवशी मकर राशीत जातो . मकई राशीचा स्वामी शनी हा सूर्यपुत्र आहे , म्हणजेच १ महिन्यासाठी पिता आपल्या पुत्राच्या घरी जातो . पिता - पुत्र ह्यांच्यातील प्रेमाच्या संबंधाच्या दृष्टीने ह्या दिवसाला महत्व आहे. संक्रांतीच्या दिवशी दर १२ वर्षांनी कुंभमेळा भरवला जातो.आपल्या असंख्य शापित पूर्वजांना पाताळातून मुक्त करण्यासाठी , भगीरथाने ह्याच दिवशी गंगेला स्वर्गातून खाली आणले.

उत्तरायणात दिवस मोठा व्हायला लागलेला असतो , त्यामुळे अंधारावर उजेडाचा विजय समजला जातो. ह्या वेळी लहान मुलांचे बोर नहाणं करतात . दुष्ट शांतींपासून मुलांचे त्यामुळे संरक्षण होते .

संक्रांतीच्या दिवशी सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत पुण्यकाळ असतो . ह्या काळात तीर्थस्नानाला विशेष महत्व आहे.गंगास्नानासाठी लाखो लोक जमतात .मकर संक्रांत ते रथसप्तमी हा पर्वकाळ

असतो. ह्या पर्वकाळी केलेले दान व पुण्यकर्मे , विशेष फलद्रुप होतात .वाण देणे म्हणजे दान देणेच .संक्रांतीचा काळ साधनेला पोषक असल्याने , ह्या काळी दिलेल्या वनांमुळे देवतेची कृपा होते .तिळाला फार महत्व आहे . तीळ होम , तिळाचे दान ह्यामुळे पापक्षालन होते. आयुर्वेदानुसार थंडीच्या दिवसात तीळ खाणे लाभदायक असते संक्रांतीच्या पर्वकाळात कठोर बोलणे टाळावे . ह्या वेळी जावयाला वाण देतात .सुनेचे व लहान बाळांचे निरनिराळ्या प्रकारचे हलव्याचे दागिने घालून कोडकौतुक करतात . ह्या दिवशी काळी साडी नेसण्याची प्रथा आहे. आपल्या सर्वांचे यशाचे पतंग उंचच उंच उडत राहो हि सदिच्छा व मकर संक्रांतीच्या सर्वांना लाख लाख शुभेच्छा

सौ. शोभा लिमये.

सावर

मृद्गंधाच्या स्निग्ध दवाचे
हळूच झाले अत्तर अत्तर
भिजला वारा, भिजला तारा
भिजल्या धारा, कातर कातर

प्राजक्ताचा शुभ्र पिसारा
देठामधले स्पर्शही केशर
आतुर ओल्या चिंब मनाला
तिथेच मिळेल ओले उत्तर

इंद्रधनूच्या छेडूनी तारा
गहिरे झाले स्वर न स्वर
धीवर घाले साद रानभर
फुटतील बांध आवर सावर

- सौ. हिमानी निलेश

पंगत

सनईचे सुरेल सूर
वातावरणात भरलेला हवनाचा धूर,
जरतारी कपड्यांची लगबग
दिव्यान्ची रोषणाई झगमग
त्यात हळुवार खुणावणारी तू ...

नातेवाईकांचा गलका
इथेतिथे बागडणारा सोनेरी झुमका,
बांगड्यांची नाजूक किणकिण
नि पैंजणाची अल्लद रुणझुण
त्यातही आपलं अस्तित्व मिरवणारी तू...

हिरवेकंच केळीचे पान, नि सागवानी पाट
उदबत्तीचा मंद सुवास, सभोवती रांगोळीचा थाट,
पिवळंधम्मक वरण, नि पांढराशुभ्र साधाभात
चटणी, कोशिम्बीर, भाजी, भजी अन मसालेभात
प्रथमदर्शनीच जीव तृप्त करणारी तू...

जिलब्यांची ताटं, मठ्ठयाचे पेले
वाळ्याचे थंडगार पाणी, नि मोगऱ्याची फुले,
पक्वान्नांची सात्विक गोडी
जोडीने रंगणाऱ्या खाण्याच्या चढाओढी
या साऱ्याची साक्षीदार तू ...

बदलला काळ,नि पुढारलं जग
रूपही तुझं झालं अलग
बहुढंगी बुफेने घेतली तुझी जागा,
परि मराठमोळ्या पंगतीची कुठे त्यात मजा?
आठवणींत ताजी आजही तू ...

सौ. पल्लवी कुलकर्णी-अत्रे (मेलबर्न)

महाराष्ट्राची खाद्यभ्रमंती

मैफिल होते स्वादाची, महाराष्ट्रातील घरोघरी,
पाककलेची गोडी उतरली, अन्नपुर्णेच्या करी...!!

ताट वाढले, भोजन करण्या, बिगीबिगीने यावे,
निवांतपणाने लज्जत घ्यावी, बसून पाटावरी....!!

लिंबु,चटण्या, मीठ, लोणची,भजी, वाटल्या डाळी,
पापड, कुर्ड्या, वडे, सांडगे, खमंग कोशिंबीरी...!!

उसळी,भाज्या, पालेभाज्या ,हे अळूचे फदफदे,
अळूवडी, पाटवडी, सांबारवडी , खास नागपुरी..!!

बाकर भरुनी,खुसखुशीत , तळली बाकरवडी,
शुद्ध तुपाची धार अविरत , वरणभातावरी........!!

गोड केशरीभात, मसालेभात , अतीचवदार,
नागपूरच्या वडेभाताची, लज्जत औरच न्यारी...!!

पुरणपोळी,घारगे,धपाटे,धिरडी,दशम्या,घावणे,
विविध खिरींच्या वाट्या भरल्या,घ्या बासुंदीपुरी.!!

कढी,घुटे,सार,कटाची आमटी,पंचामृतही केले,
मावळातल्या मांसवडीच्या, रश्शावरली तर्री......!!

कोथिंबिर खोबरे.., पेरून केली साबुदाणा खिचडी,
सांजा गुळाचा,वरणफळे अन् तिखटगोड सांजोरी.!!

वांग्याचे भरीत,ठेचा मिरचीचा, खानदेशी ठसका,
म्हाद्या सातारी..न् ..,झुणक्यासोबत भाकरीच बरी.!!

कोकणातला मोदक स्पेशल तूप धालुनी खावा,
वडे मालवणी ,मसाल्यातली झणझणीत मच्छी करी.!!

घाम फोडतो, जाळ काढतो, नागपुरी सावजी,
तांबडा,पांढरा अन् चटकदार मिसळ कोल्हापुरी.....!!

वडापावही हरकत नाही, चटणी मिरचीसोबत,
बेळगावचा कुंदा, सातारी कंदी,शेगांवी कचोरी भारी.!!

लाडू, करंजी, अनारसे, चिरोटे, चकली, कडबोळी,
प्रसिद्ध चिवडा नाशिकचा, बकाणे येता जाता भरी...!!

नका उठू इतक्यात, जरासा दहिभात घ्यावा,
विडा खाऊनी पाहुणे, पडावे अंमळ सोफ्यावरी.......!!

सौ. सुनीता शिंदे.

ऑस्ट्रेलियन डायरेक्टर्स गिल्ड अवॉर्ड्स

ऑस्ट्रेलियन डायरेक्टर्स गिल्डचे आमंत्रण मला इमेल ने मिळाले. मी Voices नावाची एक फिल्म बनवली होती,त्यामुळे मी गिल्डचा सदस्य झालो होतो. मुख्य कार्यक्रम सिडनीच्या "सिटी रिसायटल हॉल" मध्ये होता आणि डिनर "आयव्ही रूम"मध्ये होता. हॉलिवूडमध्ये जो मान ऑस्कर ला आहे तोच मान ऑस्ट्रेलियात ह्या कार्यक्रमाला आहे. आमंत्रणात "ब्लॅक टाय" असा स्ट्रिक्ट ड्रेस कोड होता.

मी ह्या कार्यक्रमाला जाण्याचे मुख्य कारण म्हणजे आपल्या एडलेड मधील अँटनी मरास ह्या दिग्दर्शकाला भेटण्याची संधी. स्वतः: वकील असणाऱ्या अंथोनीने मुंबईतील "ताजमहाल हॉटेल" वरील हल्ल्यावर "हॉटेल मुंबई" ही फिल्म बनवली होती. लिहीली. "कसाब"वरील हजारो पाने आपल्या एका डॉक्टर मित्रासोबत डोळ्याखालून घातली, हल्ल्याची फुटेज पाहिले आणि त्याचा फिल्ममध्ये उपयोग केला. ह्या चित्रपटाआधी त्याने दोन शॉर्ट फिल्म्स बनवल्या होत्या आणि त्याबद्दल त्याचे भरपूर कौतुक झाले होते आणि अनेक अवॉर्ड्स मिळाले होते. "हॉटेल मुंबई" हि त्याची पहिलीच फिचर फिल्म होती. गिल्डच्या समारंभात त्याला "सर्वोत्तम दिगदर्शक" म्हणून नामांकन मिळाले होते.

मी सीबीडी मधील एका हॉटेलमध्ये उतरलो होतो. संध्याकाळी पाचच्या सुमारास तयारीला लागलो. पांढराशुभ्र प्लिटेड शर्ट घातला, काळी बटणे लावली. कॉलरचे बटन काही केल्या नव्हते लागत नव्हते, शेवटी गेला आवळून कसेतरी ते बटन लावले, वर महत्प्रयासाने काळा बो-टाय लावला, काळे बूट घातले आणि खाली रिसेप्शनला आलो. काहीजण माझ्याकडे आश्चर्याने पाहात होते. मी मिश्किलपणे म्हटले,"शेकन नॉट स्टर्ड". जेम्स बॉण्डचे ते सुप्रसिद्ध वाक्य ऐकून ते सगळे हसले.

मी टॅक्सी केली होती,ड्रायव्हर अफगाणी, तो सारखा चकरा मारू लागला, शेवटी पायीच निघालो. माझ्यासारखीच "पेंग्विन ड्रेस" केलेली दोन माणसं दिसली."सिटी रिसायटल हॉल"च्या दारात लहानशी रांग तयार होऊ लागली. आत "रेड कार्पेट"वर सर्वांचे स्वागत करण्यात येत होते. एका भारदस्त माणसाने हस्तान्दोलन करून एक एक आमंत्रिताला आत सोडले. मी अंथोनीला सपोर्ट आणि कॉंग्रॅच्युलेट करण्यास खास अडलेड वरून आलो आहे असं सांगायचा विचार करत होतो. तेव्हढ्यात माझ्या लक्षात आले की मी गर्दीमुळे "प्री-इव्हेन्ट ड्रिंक्स"च्या हॉलमध्ये आलो होतो. इथे वेट्रेसेस प्रकारचे ड्रिंक्स आणि खाद्यपदार्थ घेऊन

फिरत होत्या. मी शॅम्पेनचा "फ्लूट" हातात घेऊन अनोळखी माणसांची ओळख करून घेत फिरू लागलो. सर्वजण फ्रेंडली होते. आजूबाजूला टीव्ही इंटरव्ह्यू चालू होते. नटनट्यांचे ओळखीचे चेहेरे दिसत होते. सुंदर सुंदर नट्या सुंदर गाऊन घालून आल्या होत्या. एव्हाना माझी नॉमिनेशन मिळालेल्या बर्याच जणांशी ओळख झाली. मी ओळखीच्या वाटणाऱ्या नटीला विचारले,"अँटनी आला आहे का?", ती म्हणाली,"नाही, तो उंच व टकला आहे, आला तर दिसेलच.". मी म्हटले," बेस्ट डायरेक्टरचे नॉमिनेशन आहे, तो येईलच." ह्या सर्व प्रसिद्ध नटनट्यांमध्ये कुणीही भाव खात नव्हते.

शेवटी कार्यक्रम सुरू झाला. दोन सुंदर स्त्रिया त्याचे संयोजन करत होत्या. रेचेल ग्रिफिथ ने मुख्य भाषण केले. "म्युरिएल्स वेडिंग" ह्या प्रसिद्ध ऑस्ट्रेलियन फिल्ममधली नटी आता दिग्दर्शक झाली आहे. तिने दिग्दर्शित केलेला चित्रपट "राईड लाईक अ गर्ल" फारच छान आहे. तेरेसा पामर ही अडलेडमधली नटी (जी आता हॉलिवूड स्टार आहे) तिची ह्यात मुख्य भूमिका आहे. सर्वानी हा चित्रपट अवश्य पाहा!! सर्वोत्तम दिग्दर्शकाचे बक्षीस दुसऱ्याच कुणाला मिळाले व माझी थोडी निराशा झाली. नंतर कळले की अँटनी अमेरिकेत शूटींग करत होता आणि म्हणून कार्यक्रमाला आला नव्हता.

कार्यक्रमानंतर आमंत्रितांना "आयव्ही हॉल"मध्ये डिनर होता. आमंत्रितांच्या नावाची यादी बाहेरच लावली होती. आत अनेक गोल टेबलं सजवली होती. प्रत्येक टेबलावर १० जण होते. प्रत्येकाचे नांव , मेन्यु आणि ड्रिंक्स मेन्यू ची प्रिंट ठेवली होती. मंचावर वाद्यवृंद मंद स्वरात व्हायोलिन , गिटार , फ्लूट , बेस व ड्रम वाजवत होते. माझ्या टेबलावर एक हार्ट थ्रॉब बनलेला नट, एक नटी, काही निर्माते आणि दिग्दर्शक होते. आम्ही एकमेकांचीओळख करून घेऊन फोटो काढले. का कुणास ठाऊक पण एका जुन्या टीव्ही डायरेक्टरला माझ्यासोबत फोटो काढायचा होता. समोर वेगवेगळ्या डीशेस आल्या. मला सामान माशाची डिश मिळाली. पहिल्या दोन कोर्सेसनीच माझं पोट भरलं. खूप गप्पा झाल्या. मला एकही भारतीय दिसला नाही. पुष्कळांनी मला त्यांची कार्ड्स दिली. ११:३० होऊन गेले होते. पार्टी रंगात आली होती. डेझर्ट साठी पोटात नसल्याने मी टेबलावरच्या फेमस लोकांचा "सी यु, गुड नाईट" करत निरोप घेतला.

(डॉ.) उत्तमचन्द्र हेमचंद्र गायकवाड

(ऑस्ट्रेलियन डायरेक्टर्स गिल्ड मेम्बर)

छंद नाणी संग्रहाचा

छंद म्हटला की बरेचवेळा शाळेतील तोंडी परीक्षेत दिलेली लांबलचक यादीच आठवते. काड्यापेट्यांची खोकी, पोस्टाची तिकिटे, नदीवरील शंख-शिंपले ते अगदी रंगबेरंगी कागद गोळा करण असे अनेक चित्रविचित्र छंद ऐकायला मिळायचे. अर्थात छंद म्हटलं की काहीतरी सतत करत रहावस वाटतं, मग ते कितीही सामान्य असलं तरी त्यातून मिळणारा आनंद काही वेगळाच असतो. मलाही एक सहज जडलेला परंतु थोडासा हटके छंद म्हणजे जगभरातील स्मरणीय नाणी व नोटा जमा करण. हा छंद जडला तो मी इयत्ता चौथीत असताना म्हणजे साधारण २००४ साली. त्यामागे एक छोटीशी आठवण आहे - एका दिवाळीची! एकत्र कुटुंबात दिवाळी साजरी करण्याची मजा काही वेगळीच असते. त्या धनत्रयोदशीला आजोबांनी कपाटातून काढलेली पेटी माझ्या आयुष्याला वेगळीच कलाटणी देऊन गेली. पेटीतून काढलेल्या जुन्या नोटांनी व नाण्यांनी नकळत माझे लक्ष वेधून घेतले. त्यातील १८३५ सालचे ईस्ट इंडिया कंपनीचं एक क्वार्टर आण्याचं नाणं पाहून अश्या जुन्या नाण्यांचे आणि नोटांबद्दलचं एक निराळाच कुतूहल माझ्या मनात निर्माण झाल. आजोबांना हट्ट करून मिळवलेलं ते पहिलं आणि अविस्मरणीय नाणं आजही माझ्या संग्रही आहे. या प्रसंगामुळे अश्या प्रकारची जुनी नाणी जमा करण्याचा छंद मला जडला आणि आजही तो कायम आहे. गेल्या १६ वर्षांपासून तब्बल ४५ हुन अधिक विविध देशातील, निरनिराळी, वापरात असलेली-नसलेली, ऐतिहासिक, स्मरणीय अशी ४१० नाणी व काही निवडक नोटा असा संग्रह माझ्याकडे जमला आहे.

या नाण्यांच्या संदर्भात घडलेले अनेक किस्से आठवले कि आजही मनात नकळत हसू येते. बसच्या तिकिटाचे नेमके सुट्टे पैसे नसल्यामुळे, इच्छा नसतानाही २ रुपयांचे शिवाजी महाराजांचे चित्र असलेल नुकतेच मिळालेले नाणे बस कंडक्टर ला द्यावं लागण, पण अचानक शाळेबाहेरील पेरूवाल्या आज्जीं कडून पेरू घेताना तसच

नाणं परत मिळणं; आज्जीने दिलेल्या खाऊच्या पैशात नेमकं चित्र असलेले नाणं मिळणं आणि मग ते खर्च न करता तसच बंद डब्यामध्ये जमा करणं. असे बरेच मजेशीर अनुभव मला मिळत गेले. पुण्यात शिक्षण घेत असताना एका नाणी प्रदर्शनात माझा संग्रह प्रदर्शित करण्याची संधी मला मिळाली. त्यावेळी प्रदर्शन पाहण्यास आलेल्या लोकांकडून मिळालेली कौतुकाची थाप मला आजही हा छंद जोपासायला प्रेरित करते.

उच्चशिक्षणासाठी ऑस्ट्रेलियाला आल्यानंतर मात्र माझ्या या संग्रहात खूपच भर पडली. माझ्या अनेक आंतरराष्ट्रीय मित्र-मैत्रिणींची हा संग्रह वाढवण्यात खूप मदत झाली. परदेशात अनेक

अनोळखी लोकांच्या ओळखी करण्यात माझा छंद मला खूप उपयोगी पडला. मागील वर्षी मेलबर्नला असताना एका मुलाखतीत माझी ओळख एक भारतीय गृहस्थ मा. संजय जैन यांच्याशी झाली. त्या व्यक्तीने अक्षरशः आपले संपूर्ण आयुष्य ह्या छंदासाठी वेचले आहे. माझा संग्रह पाहून ते इतके खूश झाले की त्यांनी स्वतःच्या संग्रहातील काही निवडक प्राचीन नाणी मला देऊ केली. त्यामध्ये युरोपिअन युरोच्या च्या आधी वापरात असलेल्या विविध देशांच्या कालबाह्य नाण्यांचा समावेश आहे. ॲडिलेड मध्ये आल्यानंतर 'नुमिस्मॅटिक सोसायटी ऑफ साऊथ ऑस्ट्रेलिया' चा सभासद होण्याची सुवर्णसंधी मला मिळाली. त्या निमित्ताने मी या क्षेत्रात काम करणाऱ्या अनेक परदेशी लोकांच्या संपर्कात आलो आणि खूप साऱ्या नवनवीन गोष्टी शिकत गेलो.

हा छंद जोपासण्यासाठी ज्यांची ज्यांची मदत झाली त्या सर्वांचे मी मनापासून धन्यवाद मानतो. तुम्ही दिलेले हे छोटेसे योगदान देखील माझ्यासाठी नक्कीच अविस्मरणीय आहे आणि त्यांच्या रूपात तुम्ही कायम माझ्या सोबत असाल. असं म्हणतात कि पैसा सर्वच गोष्टी नाही विकत घेऊ शकत परंतु माझ्या आयुष्यात ह्याच छंदाने तुमच्यासारखी गोड माणसे माझ्याबरोबर आयुष्यभरासाठी जोडली गेलेली आहेत. आज डिजिटल चलनाची अनेक जणांनी धास्ती घेतली असली तरी कॅशलेस होणाऱ्या या जगाचा गेल्या २५० वर्षांचा इतिहास ह्या नाणी व नोटांच्या रूपाने माझ्याकडे कायमस्वरूपी राहील.

- अक्षय सुनिल जाधव

(नाणेशास्त्र अभ्यासक, ऑस्ट्रेलिया)

जन्मदाता

(मुलीला अंगाखांद्यावर खेळविणारा, तिला मोठे करणारा पिता, लग्न झालेल्या मुलीला चार दिवसाच्या वर ठेऊन घेत नाही. कारण त्याच्या लाडाने तिच्या आयुष्याचे वळण बिघडेल.

तिच्या कर्तृत्वाचा त्याला अभिमान असतो पण ते कर्तृत्व तिने तिच्या घरी गाजवले तर त्याला अधिक अभिमान वाटतो. तिचे विश्व दुरुनच पाहुन तो तृप्त होतो. आणि या सगळ्याची तिला जाणीव असते.)

वाट गेली दूर तरी, पुन्हा येऊन भेटते,
नाळ माझी बा तुझ्याशी, मला बांधून ठेवते.

जन्मदाता माझा मला,आभाळासम वाटतो,
विश्व माझे भोवती , त्याच्याच फिरुन राहते.

तुझी लेक इथे अन्, दूर तू रानात कोठे ?
तुझे असणेच माझे, अस्तित्व होऊन जागते.

काळजाचे काळीज त्याचे, रडते लेकीसाठी,
नजर त्याची सुख तिचे, दूर असुन मोजते.

मला कांकणांची हौस अन् , तुझा खिसा रिकामा,
शोधून मला तू दिलेली..., नोट आजही स्मरते.

नकोत अश्रु , नकोत शब्द, भेटही नसे जरी,
गोष्ट माझ्या घरातील, हवा जाऊन सांगते.

तुझी गोष्ट काय होती, कळले नव्हते तेव्हा,
तीच गोष्ट सगळ्यांना, आज ऐकवावी वाटते.

मी अजूनही पाहते ते . स्वप्न तुला सांगू का ?
जत्रेतून मी तुझ्या ..., खांद्यावर बसून फिरते.

वाट गेली दूर तरी, पुन्हा येऊन भेटते,
नाळ माझी बा तुझ्याशी, मला बांधून ठेवते.

- सौ. सुनीता शिंदे

World and God

Outline of talk:

1. Creation
2. Relation between creation and God
3. God realization while fulfilling our role in this world.

If we believe in God then we have to accept him as the creator of this world. Here I would like to clarify what I mean by God here. I am referring to the creative aspect of God and not the Supreme Brahman.

Now let us see what our scriptures say about creation.

First the popular and well known Purush Sukta from Rigveda X.90. Here the greatness of the Adi Purusha is described with him having 1000 heads etc. Then we are told that he is all that is past, present and future. (Purusha evedam sarvam yadbhutam yaccha bhavyam). Then from this Adi Purusha Viraj was born (Tasmat Virala ajayat). This Viraj has been considered to be a female by some. Then from this Viraj a second purusha was born(Virajo adhpurusha). This second purusha wasthen sacrificed and from him all the creation evolved. This should be takenfiguratively saying that all the creation came from him.

The other less well known creation hymn is the Nasadiya Sukta from Rigveda X 129. Here theorigin of the world is explained as the evolution of the existent from the nonexistent. Thus from nothingness Ekam arose (Tapasah tat mahina ajayat ekam) Then desire arose in the mind of this Ekam(Kamstadagre samavartat adhi) Then this Ekam became two with the procreating form above and the created form below and there was a cord connecting them. Further the hymns says that this may be mere speculation and questions if anyone really knows this and who will declare it (Ko adhha veda ko eha pravochat).

When we come to Upanishads we find some metaphors about creation.

In Mundaka I 1-7 it says

यथोर्णनाभिः सृजते गृण्तहे च यथा पृथिव्यामोषधयः

सम्भवन्ति, यथा सतः पुरूषात्केशलोमानि

तथाक्षरात्ससम्भवतीह विश्वम

Just as a spider pours forth the thread from itself and takes it back again, just as herbs grow on earth and hair on a man, even so the universe grown from the imperishable.

यथा सुदीप्तात्पावकाद्विस्फुलिंगा सहस्त्रशः प्रभवन्ते
सरुपः, तथाक्षराद्विविधा सोम्यभावा प्रजायन्ते तत्र
चैवापियान्ति

Just as sparks shoot out from a blazing fire by the thousands resembling fire, so do the various beings proceed from that imperishable and into it they verily return. (Mun.Up II 1.1)

RELATION BETWEEN CREATION AND GOD

Does God have anything to do with the worlds he created? Or is he like a watch maker who makes a watch and then has nothing to do with it. This philosophy of aloofness is called Deism. However, we all believe that he plays an active role in this world. Otherwise there would no need to pray to him and ask his assistance. Concept of Trisuparna: In Tait Up.

The ultimate reality is conceived as a nest out of which three birds emerge. One is the material universe called Viraj. The second is the creator aspect of Supreme and is called Ishwara. The third is the indwelling aspect of God called Hiranyagarbha. Thus God not only created the world but entered it and lives there. The scriptural wording for this is as follows:

स तपस्तप्त्वा इदं सर्वमसृजत यदिदं किंच
तत्सृष्टवा तदैवानुप्राविशत तदनुप्रविश्य सत
च त्यत च अभवत

So God is in his creation and this is called Immanence but he is also beyond this and this aspect of his is called Transcendence. In Christainity also there is mention of Father, Son and Holy Ghost. Hence we need not go far to know him There is no need to look to the heavens when we pray to him. Because he is everywhere it is not necessary to go to a holy place or a temple to get near him. A verse inAvadhut Geeta says:

त्वद् यात्रया व्यापकता हता ते
स्तुत्या मया वाक्परता हता ते
ध्यानेन चेत परता हता ते

क्षमस्व देव त्रिविधापराधान

=By going on pilgrimage I ignored the fact that you are everywhere, By praising you I forgot that you are beyond praise and by meditating on you I forgot that you are beyond this as well. So please forgive these 3 offences. The Isa Up in its very first verse says Isavasyamidam sarvam.

In Atmabodha text there is a verse describing Atma and it can easily be applied to God:

आत्मा तु सततं प्राप्तो अपि अप्राप्त अविद्यया

तन्नाशेप्राप्तवत भाति स्वकंठा भरणं यथा

Thus though He iseverywhere because we overlook this fact we do not become aware of his presence.

In a lesser known (Amrutbindu) Up

घृतमिव पयसि निगुढं भूते भूते च वसति विज्ञानम

सततं मन्थयितव्य मनसा मन्थानुभूतेन

=Like butter hidden in milk, pure consciousness (here called Vijnanam)resides in every being.

In Brahdaranyak Up God is described as Antaryamin that is the inner controller. Humans are considered to be beads on a string of consciousness.

In Chando Up : The primeval being thought that it should enter Fire,water and earth (Ch,Up VI 3. 2-3)

In Bhag. Geeta : XV.13:

गामाविश्य च भूतानि धारयाम्यहमोजसा

पुष्णामि चौषधीः सर्वाः सोमो भूत्वा रसात्मकः

Entering the earth I support all beings by My energy; and becoming the fluid Soma(Moon) I maintain all plant life.

Further in Chapter XIII .15 the Lord says:

बहिरन्तरश्च भूतानां अचरं चरमेव च

I am inside and outside of beings both moveable and immoveable.

In the same chapter the Lord says:XIII.2

क्षेत्रज्ञं चापि मां विध्दि सर्वक्षेत्रेषु भारत

O Arjuna, know me as the soul in all the bodies.

Thus we have seen that after creating the world God entered it and stays there as its soul or controller.

PRACTICAL WAYS FOR GOD REALIZATION:

Firstly we should understand that God realization is not an event but a continued progress towards the goal. It occupies the span of one's entire life. One must get on this path as soon as possible. There is no guarantee of length of life.

Our scriptures say this is essential and if not there is great loss(Iha ched vedi atha satyamasti, Iha ched avedi mahati vinashti.

Consider how long it takes to master the Tea Ceremony practiced in Japan. ;

We must accept that the world is quite real and not an illusion as Shankara said. In fact only through this world we are going to elevate ourselves.

I believe a fivefold approach to this is appropriate:

1. THE RIGHT OUTLOOK TO THE WORLD: Faith is the most important requirement. Faith is said capable of moving mountains. One must have a conviction that God indeed is everywhere. Now what outlook we should have towards the world? The Marathi word I have come up with is Adaryukta Prem. That means besides loving everything also respect it. Did not Jesus say that even love your enemies. With this view one does not dislike much less hate anything. A famous English poet—Coleridge said: "He prayeth well who loveth well, man bird and beast ".

2. STUDY AND SWADHYAYA: Studying our scriptures and performing Swadhya. Vyasa once described the Pandavas as Swadhyayavant that means who regularly engaged in Swadhya. Now what is swadhyaya. It has threecomponents: Repeating the Vedic mantras, studying the philosophical part of our sacred literature and repeating the Name of the Lord understanding the meaning and concentrating on the underlying power. Any study is made up of Sravana, Manan and Nididhyasan. We should remember that all these learning activities should not be done at the expense of our family or work commitments. A spiritual guide or a Guru may help but one should be careful in selecting one.

3. COMMITMENT TO WORK: Let us admit our survival depends on work. The second verse of Isa Up says: “kurvanneha Karmani Jijivishet shatam samah. That is Only doing work we should desire to live 100 years. The Geeta not only talks about Karmayoga but emphasizes that one can become perfect that is realize the Supreme by engaging in ones work: Sve Sve Karmanybhirata samsiddhi labhate narah. Further it says Yatah pravruti Bhutanam yen sarvam idam tatam, SWAKARMANA TAM ABHYARCYA SIDDHIM VENDATI MANAVAH. There are countless stories in puranas where it is said that persons engaged in prostitution, butchers work etc also have realized the Supreme by simply doing their work as best as they can. Every daily act is to be performed as a service to God. While Geeta talks about performing karma without expectation of its fruit, there are other aspects of Karma that are important including one’s proficiency in work, dedication to work and not considering any work as inferior. It pains me to see how servants are treated in Indian films etc.

4. BEING VIRTUOUS : The 12th Chapter of Geeta is called Bhakti Yoga. Besides describing different ways of Bhakti the lord describes 39 virtues that he expects of a Bhakta. Thus simply having devotion to a deity is not enough. A Bhakta has to lead a moral life. Gurudev Ranade said a” A moral bhakti is a tautology and an immoral bhakti is a contradiction.

5. SERVING HUMANITY: This should be considered a service to God. Buddha was very much aware of the suffering of the masses and wanted their suffering removed. In Bhagwata Purana Pralhada said: Serving humanity and being kind to all was the way to serve God. Idolworship is a only a small part. Every religious function we perform or attend should result in donation to a worthy cause. We should considering discarding some old practices such as feeding Brahmins or a Kumari just for the sake of it and instead help the needy and disadvantaged.

Summary: We have talked about creation and the relationship of God to his creation. A fivefold path to God realization is shown.

Dr. Sadanand Limaye.

मैत्रीण

वाट माझी पाहतेस तू
माहित आहे मला
लागताच चाहूल मग
लपतेस का?

पाहिलंय मी तूला
माझ्या फाटका मागे
बावरून पळणे जरा
सोडतेस का ?

काही तुझ्या आवडी
कळल्या आता मला
उन्ह खाते किती तास
मोजतेस का ?

गोरे गोरे गाल अन्
घारे तुझे डोळे
मिजास तुझी किती तुला
समजते का ?

थांबव ना जरा
हा लपंडाव तूझा
मैत्रीण माझी मनीमाऊ
तू होतेस का ?

©डॉ. दीपाली प्रधान
(सुमनश्री)

गुरू

नोव्हेंबरचा महीना. पानगळीचा ऋतू सरून थंडीला सुरवात झालेली. अमेरिकेच्या पूर्व किनारया वरील न्यू जर्सीच्या घरांतून मी बाहेरचे दृश्य बघत बसले होते. ढगाळ हवा, थंडीचा कडाका, काहीही हालचाल न करता स्तब्ध उभी असलेली निष्पर्ण झाडे, दिवस लहान झाल्याने लवकर पडणारा अंधार. एकूणच वातावरण मनाला मरगळ आणणारे. बघता, बघता माझ्या मनांत विचारांची गर्दी झाली. अरे, हीच झाडे दोन महिन्यांपूर्वी वारयावर डोलत, आनंदाने विविध रंगांची मुक्त उधळण करत होती. आणि आता तीच सर्व पाने गाळून अशी अंग चोरून उभी आहेत. कुठे गेला तो आनंद आणि ती सळसळ ? संपता, संपताना सुद्धा देता येईल तेव्हढा आनंद देण्याची यांची ही मनोवृती किती नि:स्वार्थी आणि प्रेरणादायी आहे. ही निष्पर्ण, स्तब्ध झाडे मला महत्वाचा संदेश देउ लागली. निसर्ग नियमा प्रमाणे एका मागून एक ऋतु ठराविक वेळी येणारच. अशा वेळी आपण आपले संरक्षण कसे करायचे, आपली एनर्जी कमीत कमी खर्च करून अवघड काळाला कसे सामोरे जायचे हे ते मला शिकवत आहेत. आपल्याही आयुष्यात सर्व दिवस सारखे नसतात, सदा सर्व काळ निर्विघ्न, सरळ , सोपा मार्ग नसतो. अशा कठीण परिस्थितीतून जाताना आपले मन शांत आणि खंबीर ठेवले पाहिजे. अवास्तव खर्च कमी करून असलेली शक्ती सांभाळून रहिले पाहिजे. हा प्रतिकूल काळ संपून चांगले दिवस येणार आहेतच कारण सृष्टीचा तसा नियमच आहे. तेंव्हा बिकट परिस्थितीत तक्रार करत, रडत न बसता धीराने सामोरे जाणे हेच शहाणपणाचे आहे.

निसर्गातल्या अद्रुश्य गुरूचे मला असे प्रथम दर्शन झाले आणि मला अनेक गुरू माझ्या अवती भोवती जाणवू लागले. माझी नात त्यावेळी सात आठ महिन्याची होती. रांगणे आणि ज्याला त्याला धरून उभे रहाण्याच्या तिच्या प्रयत्नात ती अनेक वेळा पडत होती पण पुन्हा तितक्याच उत्साहाने प्रयत्न करत होती. तिची ती धडपड, उत्साह, हार न मानता तितक्याच आनंदाने पुन्हा, पुन्हा प्रयत्न करणे मला खूप खूप शिकवत होतं. एक दिवस ती अगदी शांतपणे काहीतरी बघत होती म्हणून कुतूहलाने मी बघायला गेले. एक मुंगी माझ्या नातीने सांडलेला बिस्कीटाचा मोठा कण उचलून घेऊन चालली होती. मुंगीने तिच्या आवाक्याबाहेरचे आव्हान स्वीकारले होते आणि त्यासाठी पडतील ते कष्ट ती मन लावून करत होती. कितीही मोठे आव्हान स्विकारायला स्वत:ची कुवत कमी समजून अव्हेरू नये.एक इतकी छोटीशी मुंगी आपल्या कृतीतून मला संदेश देत होती.

निसर्ग, प्राणी, पक्षी, लहान मुलं, अवती भोवती वावरणारी माणसं, त्यांच्या कृती, इतरांचे ऐकलेले आणि माझे स्वत:चे अनुभव यातून बरयाच शिकण्यासारख्या गोष्टी मला जाणवू लागल्या. माझ्या अवती भोवती असंख्य अदृश्य गुरू माझे जीवन घडवायला हजर आहेत फक्त मी त्यांचे अस्तित्व आणि शिकवणे मान्य करून आचरणात आणायला हवे. काही वर्षांपूर्वी फोकल डिस्टोनिया मुळे मला सतार वाजवता येईना. हाताला कोणत्याही प्रकारे इजा झालेली नव्हती आणि वाजवणे आणि लिहीणे या व्यतिरिक्त इतर क्रिया करण्यात काहीही अडथळा नव्हता. मनापासून आवडणारी गोष्ट करता न येण्यामुळे माझी फारच चिडचिड होत असे. शिवाय या परिस्थितीवर काही इलाजही नाही. माझे काय चुकते आहे हे शोधून काढण्यासाठी मी आरशासमोर बसून सतार वाजवायला लागले जेणेकरुन मला माझ्या हाताची हालचाल दिसेल. काही दिवस गेल्यावर मला आरसा हा माझा गुरू वाटू लागला. आणखी विचार केल्यावर जाणवलं की हा बाह्य आरसा कशाला माझे मन हेच आरसा आहे की. त्यात माझ्या चुका मला दिसत आहेत पण त्या स्विकारण्याची माझी तयारी हवी. त्याचवेळी मला ही कविता सुचली.

मन आरसा,मन हेच गुरू.

नित्य नेमाने येते, तुज सामोरी बैसते
अज्ञान माझे करी दूर, हेच मनोमनी इच्छिते.

तूं निर्मळ, तूं अलिप्त, तूं स्पष्टवक्ता, तूं निस्पृह
भेदभाव न तुजठायी, परखडपणाची नित्य ग्वाही.
गुरू दुजा न जगती परब्रम्हासम तुझी महती
चूक ते दाखवोनी ने मज मार्गा वरती.

सततच्या सान्निध्याने विराले एकदुजेपण
कळले न मन केंव्हा झाले एकरूप.
मनचि झाले आरसा, स्पष्ट दिसे कवडसा
निष्ठेने घेते वसा योग्य अयोग्य निवडीचा.

कशास मी शोधू बाहेरी अन्य गुरू ?
माझे मनचि माझा गुरू नेईल मज पैलपारू
बैसेन शिखरावरी यश मोदित अंतरी
गुरूची कृपा शिरावरी, मम मनाचीच माझ्यावरी.

फोकल डिस्टोनिया मुळे पियानो वाजवू न शकणार्या एका जपानी स्त्रीने आपली स्वत:ची ही अडचण कशी दूर केली व पुन्हा पूर्वी सारखी पियानो कशी वाजवायला लागली याचे इतरांसाठी तिने केलेले सुंदर मार्गदर्शन माझ्या वाचनात आले. तिच्या म्हणण्या प्रमाणे फोकल डिस्टोनिया ही स्थिती आहे. काही ठराविक क्रिया करताना तुमची बोटे या डिस्टाॅनिक स्थितीत जातात व ती क्रिया नीट करू देत नाही. त्यासाठी बोटे डिस्टाॅनिक स्थितीत नसताना बोटांची हालचाल जशी होते ते आठवायचे म्हणजे तुम्हीच तुमच्या मेंदूला पुन्हा शिकवायचे (re training). याचा अर्थ तुम्ही स्वत:च तुमचा गुरू व्हायचे.

- सौ .कालिंदी चिरमुले

कशासाठी ? पोटासाठी

अन्न हे पूर्णब्रम्ह , उदरभरण नोहे जाणिजे यज्ञकर्म.

अन्न हे दैविक आहे त्याचे सेवन हे नुसते उदरभरण नाही तर ते यज्ञकर्मा इतके पवित्र कार्य आहे हा जेवायला सुरवात करण्याआधी म्हणायच्या श्लोकाचा शेवटचा भाग. साधारण आठव्या नऊव्या महिन्यात उष्टावण झाल्यापासून शेवटच्या श्वासापर्यंत हे यज्ञकर्म आपण रोजच दिवसातून दोन वेळा तरी करत असतो . फक्त ते यज्ञकर्म असते का नुसतेच कर्म होते?

फार फार पूर्वी मानवाला दोन वेळा पोट भरण्यासाठी अमाप कष्ट करावे लागत. खूपसे निसर्गाच्या लहरीवर अवलंबून रहावे लागे. त्यामुळे अन्न मिळाले की खरोखरच परब्रम्ह (देव) भेटल्याचा आनंद होत असे व मानव तृप्त व समाधानी मनाने देवाचे आभार मानत असे. कालांतराने ही परिस्थिती पालटली. अन्नधान्य उदंड नाही तरी पुरेसे मिळू लागले. स्त्रिया असेल त्यातून नवीन नवीन पाककृती करू लागल्या. कोंड्याचा मांडा करणारी स्त्री ही पाककला कुशल, चतुर, आदर्श गृहिणी मानली जाऊ लागली. दोनवेळा मिळणाऱ्या साध्या जेवणावर आणि सणावारी होणाऱ्या गोडधोड पक्वानांवर माणसे सुखी, समाधानी होती.

निसर्गाच्या लहरींपेक्षा मानवाच्या स्वता:चे श्रेष्ठत्व सिध्द करण्याच्या राजकीय चढाओढीत आणि भरीस लोकसंख्या वाढीमुळे अन्नधान्याचा तुटवडा होऊ लागला. भारतात परदेशातून मागवलेले निकृष्ट धान्य व ते ही रेशनिंग करून वेळ निभावण्याची सर्कस चालू झाली. १९६५ - ७० काळांत तांदूळ, गहू, साखर, रॉकेल या रेशनवर मिळणाऱ्या वस्तू, त्यांची क्वालिटी आणि मर्यादा या बद्दल मी माझ्या मुलांना सांगते तेंव्हा त्यांना ते कल्पनेच्या बाहेरचे वाटते. रेशन वर मिळणाऱ्या खराब तांदूळ आणि गहू यांच्या बदल्यात बेकायदेशीरपणे मिळालेल्या चांगल्या तांदूळ व गव्हाची २ : १ या प्रमाणांत आदलाबदल शक्य होती यांवर ते चकीतच होतात. मुंबईमध्ये ठराविक वेळेला मोजकेच ब्रेड येत असत. त्यावेळांत तिथे असलात तर तुमचं नशीब. आरे कॉलनीच्या दुधाची कुपन्स सहजासहजी उपलब्ध नव्हती. मग ज्यांच्याकडे कुपन्स आहेत पण त्यांवर मिळणाऱ्या सर्व दुधाची गरज नाही अशा कुटुंबांचा शोध घेऊन दूध मिळवावे लागे. उन्हाळा आला की दुधाची क्वालिटी आणि क्वांटिटी यांवर मोठा परिणाम व्हायचा.

हळूहळू परिस्थिती पालटली. विज्ञानाच्या आधारे, शेती संशोधनाने अन्नधान्याची क्वालिटी आणि क्वांटिटी यांत प्रचंड प्रगती झाली. हरित क्रांती, शुभ्र क्रांती या खरोखरच लक्षणीय क्रांतीच होत्या.

आता भारतातही अन्नधान्याची, फळे भाजीपाला, दूध व दुग्धजन्य पदार्थांची रेलचेल पाहून मन संतुष्ट होते. ही समृद्धी आल्यावर इतर प्रांतातल्या आणि देशोदेशीच्या वेगवेगळ्या पाककृती प्रचारांत आल्या समाजातील सर्व स्तरातील आबालवृद्धांना त्या आवडूही लागल्या. त्याचबरोबर अनेक नवीन रेस्टॉरंट्स जागोजाग सुरू झाली आणि त्यातील पदार्थांची चव घेण्यासाठी लोकांच्या रांगाही तिकडे वाढू लागल्या. स्वयंपाक घरांत राबण्याचे गृहिणींचे कष्ट कमी झाले आणि मिळतं आहे तयार कशाला उगीच घरी करत बसायचं अशी वृत्ती तयार झाली.

अन्नधान्याच्या मुबलतेमुळे खाण्याशी संबंधित असे किती तरी नवीन उद्योग उदयाला आले. पूर्वी वर्षाकाठी सणावाराला फक्त होणारी गोड पक्वान वर्षभर केंव्हाही मिळू लागली. उन्हाळयात फक्त मिळणाऱ्या आइसक्रीमचे अप्रूप कोपऱ्या कोपऱ्या वर केंव्हाही वेगवेगळ्या फ्लेव्हर्सच्या आइसक्रीमने केंव्हाच नाहीस केलं.

पूर्वी करावी लागणारी धान्याची वर्षभराची साठवण, निवडणे, धान्य दळून आणणे ही कामे नष्टच झाली बहुतेक घरांतून.पैसा जास्त मिळाला की त्याची चांगल्या प्रकारे गुंतवणूक करून त्यातून जास्त फायदा कसा मिळवता येईल ह्याचा विचार सुरू होतो तसाच खाण्यापिण्यात कशापासून जास्त पौष्टिकता मिळेल याचा जोरदार विचार आणि प्रचार सुरू झाला आणि दिसून यायला लागलं की ज्वारी, बाजरी, नाचणी, वरई, राजगिरा ही खेडेगावातील गरिबांच्या खाण्यांत येणारी धान्यच पौष्टिकतेत सरस आहेत. मग त्यांच्या आधुनिक पाककृतींची चढाओढ सुरू झाली. अन्नप्राशन करताना - जेवताना- पाळायचे पिढीजात संस्कार पार विसरले गेले. सर्व कुटुंबाने एकत्र जेवायला बसायचे, जेवणा आधी श्लोक म्हणायचे, उजव्याच हाताने तेही फक्त पाच बोटांनीच घास घ्यायचा, डावा हात पाणी पिण्यासाठीच. ही शिस्त राहिली नाही. आपल्याकडे पाने मांडताना पाण्याचे भांडे ताटाच्या डाव्या बाजूला, वाटी उजवीकडे हे ठरवलेले असते, पानांत डावीकडे कोणाचे पदार्थ आणि उजवीकडे कोणते पदार्थ वाढायचे याचे नियम असतात. पाश्चात्य समाजातही जेवणाच्या आधी प्रार्थना (grace) म्हणायची पद्धत आहे. काटा आणि सुरी कोणच्या हातात आणि कशी धरायची याचेही नियम आहेत. प्लेटच्या दोन्ही बाजूला मांडलेल्या काटे, चमचे आणि सुऱ्या यांचा सीक्वेन्स ठरलेला असतो.

आता धावपळ वाढली, वेळ कमी पडायला लागला. मग दुपारचे जेवण कधी चालता, चालता, कधी गाडीतच गाडी चालवताना, जसा वेळ होईल तसा आणि होईल तेंव्हा. संध्याकाळचे जेवण टि.व्ही. समोर. कामावरून थकून भागून आल्यावर जरा निवांत टि.व्ही. पहात पहात जेवताना काय खातोय त्याची चव, कौतुक इकडे लक्षच नसतं. सगळ्या घरी असेच असेल असे नाही. पण एकूणच अन्नप्राशनाला पूजे इतके जे महत्व दिले जात असे ते न रहाता ते केवळ उदर भरण होऊ लागले. समृद्धीचा आणि बदलत्या जीवनशैलीचा परिणाम समाजात लगेच दिसू लागला. न्युट्रीशनिस्ट्स, डाएटीशियन्स, फिटनेसवाले त्यावर सल्ले देऊ लागले. थोडे पैसे जमले की चालत जायच्या ऐवजी माणूस सायकल घ्यायचा, आणखी पैसे मिळाले की गाडी घेत असे. आता घराच्या गराजमध्ये गाडी, सायकल असते तरी व्यायाम हवा म्हणून पायी चालणे, धावणे (jogging) सुरू झाले.

एकूण काय सुबत्ता आली तरी माणसाची पोटासाठी धावपळ चालूच. आधी खपाटी गेलेल्या पोटासाठी आता सुटलेल्या पोटासाठी.

- सौ .कालिंदी चिरमुले

भारतरत्न पं भीमसेन जोशी



डॉ. अरुंधती म्हाळगी (मेलबर्न)

योगा

आपल्या आयुष्यात आपण अनेक लोकांकडे आकर्षिले जातो. काहींचं बोलणं विद्वत्तापूर्ण असतं, काहींचा पेहराव आकर्षक असतो, काहींची आर्थिक सुबत्ता नजरेत भरते तर काहींची कला आपलं लक्ष वेधून घेते. हे सगळं खूपदा क्षणिक असतं. पण काही व्यक्तिमत्वं अशी विलक्षण असतात की ती आपल्या मनात घर करतात. हे लोकही अगदी साध्या राहणीचे असतात त्यामुळे बघताक्षणी आपल्यावर छाप पडतेच असं नाही. त्यांच्याबरोबर जसजसा वेळ घालवतो तसतसे ते आपल्याला अधिकाधिक भावतात. त्यांच्या व्यक्तिमत्वाचे अनेक पैलू उलगडत जातात आणि आपल्यावर खऱ्या अर्थाने प्रभाव पडायला सुरुवात होते. आपणही अनेक गोष्टी आत्मसात करायला लागतो.

आमचा ड्रायवर 'योगा' अगदी असंच व्यक्तिमत्व आहे. योगा बाली देशात राहतो. पर्यटकांना बालीमध्ये भटकंतीला घेऊन जाणे हा त्याचा प्रमुख व्यवसाय आहे. बालीमधले आठ दिवस हा सतत आमच्याबरोबर होता. गोरापान, चांगली मजबूत शरीरयष्टी, केस मागे फिरवलेले, मोठे डोळे, जाडसर आणि आखीव रेखीव ओठ, उजव्या कानामागे एक छोटंसं फूल अडकवलेलं, स्वच्छ टी-शर्ट आणि जीन्स, पॉलिश केलेले बूट आणि मनगटात काळ्या मण्यांची माळ असा त्याचा पोशाख असायचा. बालीमध्ये खूप गरम आणि आर्द्र हवा आहे. त्यामुळे आम्ही सर्रास उन्हाळी कपडे घालून हिंडायचो. पण या बाबाजीने त्याचा हा जीन्स आणि टी - शर्ट पोशाख सोडून इतर कुठल्याही प्रकारचे कपडे घातले नाहीत. ना राहवून आम्ही त्याला एकदा विचारलंच. त्यावर त्याने छान हसून उत्तर दिलं. म्हणाला ' थिस माय जॉब सो माय ड्रेस गुड'. त्याचा स्वतःचा व्यवसाय आहे ज्यात त्याला युनिफॉर्म वगैरे नाही. पण तरीही त्याने स्वतःला हे बंधन घालून घेतलेलं आहे. मला कमाल वाटली या त्याच्या शिस्तीची.

रोज सकाळी ठरल्या वेळेपूर्वीच दहा मिनिटे येऊन कार पार्कमध्ये थांबायचा. शेजारी पांढरीशुभ्र स्वच्छ धुतलेली गाडी. आमची नजरानजर झाली कि सुरेख हसून कमरेत लवून नमस्ते करायचा. मग संध्याकाळ कशी गेली, काय काय केलं अशी सगळी चौकशी करणार. आमच्या मुलाशी गप्पा मारायचा. त्या त्या दिवसाचा बेत ठरलेला असायचा. गाडीत बसलं कि आधी आज जायचं ठिकाण कुठे आहे. जायला किती वेळ लागेल, ट्रफिक किती असेल, खायला कुठे थांबायचं, जिथे जायचं आहे तिथे जायला तिकीट किती पडेल अशी सगळी माहिती द्यायचा. मग गप्पाटप्पा करत आम्ही निघायचो. मी त्याला संपूर्ण प्रवासात इतके प्रश्न विचारले पण एकदाही याने नाराजीचा सूर काढला नाही की त्याच्या कपाळावर कधी आठी दिसली नाही. खूप आनंदाने बोलायचा तो. इतके दिवस त्याच्याबरोबर प्रवास केला पण आमच्याबरोबर असताना त्याला फारतर २-३ फोन असतील. अत्यंत हळू आवाजात तो बोलायचा आणि मुद्द्याचं बोलून फोन बंद करायचा. प्रत्येक वेळेस गाडीत बसताना आणि उतरताना ४-४ वेळा आठवण करायचा. सगळं घेतलं का, काही राहिलं नाही ना, गॉगल, पर्स पाण्याची बाटली इ. इ. आणि मग सगळं एकदा स्वतः तपासून घ्यायचा. इतकं सतत गाडी चालवायचं काम आहे परंतु एकदाही त्याने गाडी चालवताना च्युईंग गम खाल्लं नाही अथवा कुठलाही पेय प्यायला नाही. त्याला आम्ही ड्रिंक हवं का असं विचारायचो पण पुढे गाडी चालवायची आहे त्यामुळे त्याने ड्रिंक कधीही घेतलं नाही. पोलिसांनी एकदाही आमची गाडी अडवली नव्हती पण त्याचा गैरफायदा याने कधीही घेतला नाही.

आम्ही बऱ्याच वेळा एकत्र जेवायला जायचो. तो येणार नाही म्हणाला तर आमचा मुलगा त्याला हाताला धरून घेऊन यायचा. जेवायला दिलं म्हणून खूप वेळा नमस्ते म्हणायचा. तो मिताहारी होता. साधारणपणे एकदा काय मागवलंय त्यावर तो समाधानी असायचा. जेवण झालं की गोडाने शेवट व्हायलाच हवा. पण योगाने एवढ्या दिवसात एकदाही गोडाला हात लावला नाही. पहिल्या दिवशी त्याला आग्रह केला. मग म्हणाला ' माय फादर डाय डायबेटिस सो नो स्वीट'. तो नियम त्याने शेवटपर्यंत पाळला. ज्या हॉटेलमध्ये त्याने कधी जेवण केलं नाही तिथे त्याने आम्हाला कधीच नेलं नाही. पण त्याने कुठल्याही हॉटेलला कधीही नावं ठेवली नाहीत.
'थिस हॉटेल आय नॉट रेकमेंड फॉर यू' म्हणायचा.

बालीमध्ये फार कमी लोकांना इंग्रजी येतं. पण योगा त्यामानाने खूपच छान इंग्रजी बोलायचा. म्हणजे त्याच्याबरोबर गप्पा मारता येतील इतकं चांगलं. योगा पूर्वी ५-७ वर्ष बँकेत कामाला होता. पण कंत्राटी काम किती दिवस करणार. त्यामुळे त्याने ते सोडून दिलं. मग तो युरोपमध्ये गेला तिथे त्याने ५ वर्ष बोटीवर काम केलं. ग्राहकांशी कसं बोलायचं, आपलं राहणीमान कसं हवं, गिऱ्हाइकाला आपलंसं कसं करून घ्यायचं, इग्रंजी कसं बोलायचं, वेळेचं महत्व, आपल्या कामाची जाहिरात कशी आणि कुठे करायची, त्यासाठी सोशल मीडियाचा वापर कसा करायचा हे सगळं त्या पठयाने तिकडे शिकून घेतलं. प्रवासाने मनुजा चातुर्य येते म्हणतात ते असं. अफाट अनुभव गोळा करून तो परत बालीला आला. आणि स्वतःचा व्यवसाय सुरु केला. एक गाडी आहे ५ सीटर आणि दुसरी आहे १० सीटर. जशी गरज असेल त्याप्रमाणे तो सेवा पुरवतो. त्याच्या गाडीमध्ये त्याने एक छोटीशी पुस्तिका तयार करून ठेवलीये. त्यात बालीचा नकाशा, पाहण्याची ठिकाणं, पुरवल्या जाणाऱ्या पॅकेज सुविधा अशी सगळी माहिती आहे. इतरही अनेक जण बालीमध्ये हा व्यवसाय करतात. त्यांच्याबरोबरसुद्धा याचे खूप चांगले संबंध आहेत. सगळी ड्रायवर मंडळी अधूनमधून टीम बिल्डिंग साठी वेगवेगळ्या खेळात सहभागी होतात. एकमेकांच्या गिऱ्हाईकाला मदत म्हणून त्याच्या गिऱ्हाइकाला घ्यायला जाणे, सोडून येणे वगैरे एकमेकांसाठी करतात.

बायको हॉस्पिटलमध्ये नर्स आहे. ३ मुलं आहेत आणि ती शाळेत शिकतात. बायकोचं नाव पुट्टु. बायकोमुलं कशी आहेत विचारलं कि त्याचं उत्तर ठरलेलं असायचं. 'येस पुट्टु! माय वाइफ. शी इज गुड. टुडे नाईट शिप' असं म्हणून तिला आज कुठली शिफ्ट आहे ते सांगायचा. मुलांना इग्रंजी शिकवणार म्हणाला. त्याच्या या व्यवसायामुळे अनेक वेळा तो घराबाहेर असतो. घरी असला कि मुलांबरोबर खेळतो, सगळ्यांना देवळात घेऊन जातो, एकत्र टीव्ही बघतो. योगा कष्टाळू आहे. बायकोचं शिफ्टवर्क असल्याने ती दमते. बायकोचा आदर करतो. घरातल्या कामात हातभार लावतो. योगा मला अगदी फॅमिली मॅन वाटला.

योगा हे व्यक्तिमत्व मला अजब वाटलं. बालीसारख्या फारश्या प्रगत नसलेल्या देशात मला हा माणूस भेटावं याचा आश्चर्य वाटलं. कदाचित हा देश चंगळवादापासून दूर असल्यानेच हा योगा इथे भेटला असावा. अगदी आदर्श व्यक्तिमत्व. साधी राहणी पण उच्च विचारसरणी. या योगाने ना कुठला कस्टमर्स सर्व्हिस चा कोर्स केला ना कुठला मेन्टॉरिंग सेशन. पण काय प्रकारची सर्व्हिस गिऱ्हाइकाला आवडेल हे ओळखून बरोबर काम करतो हा. जेवढा आम्हाला अपेक्षित होतं त्यापेक्षा नेहेमी जास्त देत होता तो. 'ऑल्वेज डुईंग गुड कर्मा' हे त्याचं तत्व होतं. आणि त्यावर त्याचा दृढ विश्वास होता. शहरापासून दूर तो एका खेड्यात जाऊन राहिला. साहजिकच त्याला दर वेळेस शहरापर्यंत जायला जास्त कष्ट पडायला लागले. कारण साधारणपणे पर्यटक मध्यवर्ती भागात राहणं पसंत करतात. पण याची जराही तक्रार नव्हती. 'आय लिव्ह पीसफुल' म्हणाला. मदतीसाठी हा कायम पुढे. एकदाही त्याच्या तोंडून त्याची स्वतःची स्तुती आम्ही ऐकली नाही. केलेलं प्रत्येक काम हे तो सेवा म्हणून करतो. त्याच्या व्यतिमत्वाचे हे पैलू त्याला त्याच्या व्यवसायात खूप उपयोगी पडतात. त्याचे जवळ जवळ सगळे कस्टमर्स कुणाच्या ओळखीने त्याच्याकडे येतात. त्याचा हे ' कर्मसु कौशलम्' त्याला ' योग ' मिळवून देवो. हा योगा आम्हाला खूपच भावला. हे एक अजब रसायन होतं. आजकालच्या चकमकीच्या आयुष्यात आपल्या तत्वाला घट्ट धरून राहणारे फार कमी दिसतात. योगशिवाय बलिदर्शन होऊच शकत नाही असं मला वाटलं.

बालीची ट्रिप संपत अली. ८ दिवस कसे उडून गेले कळलंच नाही. निघायच्या आधी 'आता परत जायचं' या विचाराने कससंच झालं. योगाने ओळखलं असावं. 'यू गोइंग बॅक टू रिऍलिटी' मिश्कीलपणे म्हणाला. हो ना काय करणार असा विचार दर्शवण्यासाठी मी नुसतीच मान हलवली. 'कम अगेन अँड रेकमेंड फॉर युवर फ्रेण्डस माय सर्व्हिस ', म्हणलं नक्कीच करेन. निघायच्या दिवशी त्याला फार लांब यायला नको म्हणून जवळच टॅक्सी होती ती करून जाणार होतो. तसं त्याला सांगितलं पण येतो म्हणाला. 'धिस सर्व्हिस आय डू फॉर यू फॉर लास्ट डे'. खूप लांबून आला सोडायला. आमचा पायाच निघत नव्हता बालीमधून. बालीची वनश्री, तिथला चाफा, तिथले लाजाळू लोक, कष्ट करणाऱ्या पण सतत हसतमुख मुली सगळं सारखं नजरेसमोर येत होतं. आम्ही एयरपोर्टवर आलो. योगा अदबीने जवळ आला. कमरेत लावून नमस्ते केलं. आम्ही पण नमस्ते केलं. एकमेकांना शुभेच्छा दिल्या. त्याला आम्ही गुडबाय केलं. त्यावर मस्त हसून तो म्हणाला, ' नो से गुडबाय, से सी यु अगेन सून'. अरे हो की! असं म्हणल्याने परत यायचा रस्ता खुला झाला.

सगळ्यांनाच त्याचं हे वाक्य आवडलं आणि आमच्या हसण्यामुळे ते भारलेल्या वातावरणात एकदम हलकेपणा आला. आम्ही निघालो. आम्ही दिसेनासे होईपर्यंत तो हात हलवत उभा होता.

आम्ही सगळे सोपस्कार आटपून गेटपाशी येऊन थांबलो. माझ्या मोबाईलवर योगाचा मेसेज होता. 'आय डू सर्व्हिस फॉर यू. प्लीज अपोलोजाईज मी इफ समथिंग नॉट गुड ड्यूरिंग आय असिस्ट यू अँड फॅमिली ऑन हॉलिडेज. गुडलक अँड सी यू नेक्स्ट टाइम'. या लाघवी स्वभावाने त्याने अनेक गिऱ्हाईकांना आपलंसं करून घेतलंय. त्याच्या व्यवसायाची खूप भरभराट होईल आणि त्याची सगळी स्वप्नं पूर्ण होतील असा विचार माझ्या मनात आला.

आपण करतो त्या कामाला त्याने सेवा मानलेलं आहे. त्यात तो त्याचं शंभर टक्के देतो. 'ऑल्वेज डुईंग गुड कर्मा ' या तत्वाला धरून चालतो. हेच तर गीतेचं सार आहे. त्याने गीता वाचली असेल असा मला वाटत नाही. पण त्यातला उपदेश तो रोजच्या जीवनात उतरवत आहे. हे खरं प्रभावी व्यक्तिमत्व. हेच आपण त्याच्याकडून शिकायला हवं.

आम्हाला योगाने अगदी आपलंसं करून घेतलं. बालीमधले सगळेच लोक अगदी निर्मळ आणि प्रेमळ आहेत. तुम्हीसुद्धा बालीला जा. तो प्रदेश नितांत रमणीय आहे. योगाला भेटा . त्याच्याबरोबर बाली हिंडा आणि सुरेख आठवणी घेऊन या.

ओम स्वस्ति: अस्तु ।

(बालीला जाऊन योगाबरोबर हिंडायचा विचार असेल तर या नंबरवर संपर्क साधा: + ६२ ८७७ ८२६३ ३४३४)

सौ. प्राची गोखले – साकुळकर (मेलबर्न)

सी.रामचंद्र

१९५७ साली अण्णांचे ५ पैकी ४ बोलपट दणक्यात हिट झाले. ह्या वर्षी आलेले बोलपट होते, आशा, बारीश, नौशेरवान-ए-आदिल, शारदा आणि तलाश. पैकी शारदा सोडून सर्वच चालले. शारदासुद्धा चालला, पण इतर बोलपटांइतका नाही.

आशा हा किशोरकुमार-वैजयंतीमाला आणि प्राण अभिनित बोलपट. ह्यात अण्णांनी किशोर, लता आणि आशा ह्या तिघांचाही सुरेख उपयोग करून अप्रतिम स्वर-रचना केल्या. लताच्या मधुर आवाजात, “जरा रूक रूक के”, “तु ना आया और होने लगी शाम रे” आणि “चल चल रे कन्हाई छलिया” ह्या अप्रतिम रचना सादर केल्या. पहिल्या दोन गाण्यात लताचा आवाज खूपच गोड वाटतो, आणि हा गोडवा जवळ जवळ अण्णांच्य सर्वच रचनात आढळतो. तिसर गाणं हे अण्णांचा अजून एक खास राखीव प्रांत होता,हे म्हंजे लता स्पेशल अण्णा रचना म्हणायला हरकत नाही. ह्यात लताचा गोडवा अजूनच खुलतो आणि जेंव्हा ती वरच्या सुरात जाऊन आलाप घेते तेंव्हा तर....ऊफ्फ्फ....अनेक रचनांप्रमाणे ह्यातही अत्यंत नाजूक वाद्य रचना आहे. किशोरकुमारच्या खट्याळ आवाजात गायलेल ईना मिना डिका अजूनही निनादत आहे, पण त्याच किशोरच्या आवाजातील गंभीर छटेचा आणि विषण्णपणाचा सुरेख आणि सुरेल वापर करून,”हाल तुझे अपनी दुनिया का नजर तो आता होगा” हे विषण्णतेचा सुर लावणारे गाणं दिल. आशाबाईंनी अण्णांकडील आपले बस्तान मजबूत केले आणि त्यांनी “ईना-मिना-डिका” हे धम्माल गाण तर म्हटलच, पण त्याच बरोबर “सो जा रे चंदा सो जा, चंदनिया अरज करे” ही अजून एक अप्रतिम रचना गाईली. अण्णांच्या हातखंडा अंगाईला बोलपटातील प्रसंगानुरूप टच देऊन हे गाण बनवल होतं. नायक किशोरकुमार विमनस्क मनःस्थितीत खलनायकापासून (प्राण..अजून कोण) लपायला नायिकेकडे येतो. तिला वस्तुस्थिती कळलेली असते आणि ती एकाच वेळी आर्जव करायचा, धीर द्यायचा, समजूत काढायचा आणि शांत करायचा प्रयत्न करत असते. हे सगळे भाव चालीत आणि सुरात अण्णा आणि आशाबाईंनी ओतलेत. आशा फिल्मफेअरसाठी शर्यतीत होता पण नय्यरच्या नया दौरला फिल्मफेअर मिळाल.बारीश हा देव-आनंद नुतनचा गुन्हेगार-पट. हा सुद्धा संगीत-पुण्याईवर रजत जयंती साजरी करता झाला. अण्णा-लताने म्हटलेले “केहेते है प्यार किसको, पंछी जर बतादे”, “फिर वोही चांद वोही हम”, आणि अण्णांनी गायलेले “दाने दाने पे लिखा है खाने वाले क नाम” ही गाणी खूप गाजली. तलाशची गाणी मी फारशी ऐकली नाहीत. शारदा हा राज कपूर मीनाकुमारीचा चित्रपट. ह्याचं संगीत काही खास नव्हत. मुकेशला राज कपूरच्या अती-आग्रहाखतर दिलेल “जप जप जप रे” हे गाण लक्षवेधी होतं
लता-आशा ह्या भगीनींकडून एक लखलखता हिराच गाववून घेतला”ओ चांद जहां वो जाए”. ह्या गाण्याचं वर्णन काय करू? सुरूवातीची गोड व्हायोलिन्स, तालात लागलेला तबला आणि खंजिरी, सतार, पावा...टिपिकल अण्णांची गोड सुरावट. तबला तर असला गोड वाजलाय ह्या गाण्यात की बस्स!!!!

ह्या वर्षीचा हायलाईट मात्र होता नौशेरवान-ए-आदिल. एकाहून एक अप्रतिम गाणी दिलीत अण्णांनी ह्यात. विशेष म्हणजे ज्या मिनर्व्हा मुव्हीटोनमधील नोकरी वाचवायला ते संगीत खात्यात गेले होते त्याच मिनर्व्हा मुव्हीटोनने त्यांना संगीतकार म्हणून करारबद्ध केलं. केव्हढी मोठी झेप!! लताबाईंनी गायलेले,”रात ढली, जान चली”, “भीनी भीनी है हल्की हल्की है” ही लताबाईंची गोड गाणी होती.नौशएरवान-ए-आदील मध्ये लताबरोबर रफीचा अण्णांनी मनसोक्त वापर केला. बराच काळ रफी खास काही गायला नव्हता त्याची भरपाई त्याला इथे करून दिली.”भूल जाए सारे गम” हे द्वंद्वगीत लता-रफी गायले.पण खरी जादू अण्णांनी ह्या दोन गाण्यात केल्येय. लता-रफी द्वंद्वगीतात पहिल्या क्रमांकासाठी हक्कने उभ राहू शकेल असं “तारोंकी जुबां पर है मुहोब्बत की कहानी” आणि रफीने आपल्या आवाजातील दर्द ओतून गायलेले,”ये हसरत थी की इस दुनिया में”. १९५८ सालापासून अण्णांची घसरण सुरु झाली. ह्याच सुमारास लताशीसुद्धा त्यांचे तीव्र मतभेद झाले आणि लता काही काळ अण्णांकडे गाईनाशी झाली.रफी-मुकेश हे त्या सुमारास प्रमुख आवाज म्हणून पक्के झाले होते. मुकेशला राज कपूरची पसंदी होती तर रफीला दिलीपकुमारची.देव आनंद आणि बर्मनदादा किशोरकुमार, हेमंतकुमारला पसंदी देत, पण खरी बाजी रफीनेच मारली. तो सर्वांसाठी सारख्याच परीणामकारकपणे गायचा. त्याचसुमारास नय्यर युगाची सुरूवात झाली.१९५४ ला

आरपार ह्या बोलपटाद्वारे इशारा देणार ओ.पी. एक वजनदार नाव झाला होता. शंकर-जयकिशन, रोशन, मदन मोहन हे नव्या दमाचे संगीतकार होतेच. लता आणि रफी न वापरल्याचा अण्णांच्या संगीतावर परिणाम झालाच. त्यांनी नेमकी तुलनेने डावी गाणी रफीला दिली तर अनेक उत्तम रचना महेंद्र कपूरला देऊन त्यांची माती केली. असो. १९५८ साली अण्णांचे अमरदीप, कारीगर, राजतिलक आणि तलाक हे ४ बोलपट आले. ह्यापैकी फक्त तलाक चालला.बहुदा कारीगरमध्ये स्व.सुधीर फडके अण्णांकडे गायले. राजतिलकमधील गाणी सुद्धा फार गाजली नाहीत. अमरदीपची मात्र काही गाणी बेफाम गाजली.असं असल तरी, बिनाका गीतमालामध्ये ती पहिल्या १५ मध्ये सुद्धा नव्हती. नंतर एका लेखात राजू भारतन ने ह्याबद्दल अमीन सयानीला दोष दिला होता. असो. अमरदीपमध्ये रफी-अशाने गायलेले,"देख हमें आवाज ना देना" हे अप्रतिम द्वंद्वगीत २ भागात होत. तसंच लताने गायलेले, ठेकेदार,"मेरे मनका बावरा पंछी क्यूं बार बार डोले" ही दोन्ही गाणी गाजली.तसेच "दिलकी दुनिया बसाके सांवरीया तुम न जाने कहां खो गये" हे गाण सुद्धा गाजल. ह्या गाण्याविषयी अण्णा एकदा म्हणाले होते,'एका कव्वालाकडून ऐकलेला मध्यम माझ्या कानात बसला होता, तोच मी ह्या गाण्यात लावला. गाण्यात एव्हढ काही खास नाही, पण त्या मध्यमामुळे गोड लागत".आशाने सुद्धा कमाल केली होती,"किसी दिन जरा देख मेरा भी होके", "लागी अपनी नजरिया कटार बनके" ह्या दोन गाण्यांसोबतच,"ये जी चाहता है किसी दिन मैं तेरी" हे केवळ अशक्य असं दु:खी गीत म्हणत काळजाला हात घातलाय.मुखडा हळुवार तर अंतरा वरच्या सुरात आणि परत ध्रुपद खालच्या सुरात असं हे गाण खूप गोड आहे. तलाक बोलपटात अण्णांनी फक्त आशाचा आवाज वापरला आणि पुरूष गायकात, मन्ना डे आणि महेंद्र कपूर वापरले. पण उत्तम काम करूनही मन्ना डॅ ऐवजी नंतर महेंद्र कपूरलाच संधी मिळाली. असो. तलाकमधील "ऐ जी ओ कुछ तो बोलो" हे आशा आणि महेंद्र कपूरची द्वंद्वगीत अवीट गोडीच आहे. मन्नाबाबूंनी आशाबरोबर,"मेरे जीवनमें किरन बन के" हे सुंदर द्वंद्वगीत तर "संभल के रेहेना अपने घरमें छुपे हुए गद्दारो सें" हे समरगीत म्हटल. माझ्या आठवणीत राजेंद्रकुमारवर चित्रीत झालेलं हे एकमेव गीत आहे ज्यात त्याने गाण्याला पूरक आणि चांगला अभिनय केलाय.

श्री. अभिजित मोहोळकर

जपान भेट

एडलेडच्या थेट पूर्वोत्तर दिशेला असलेला एक चिमुकला तरीही अनेक आकर्षणांपायी मनात घर करून बसलेला देश म्हणजे जपान जपानमध्ये दर वर्षी मार्च ते एप्रिल दरम्यान साकुरा म्हणजेच चेरी ब्लॉसमच्या नाजूक फुलांना बहर येतो आणि ते अतिशय प्रेक्षणीय दृश्य असतं. त्याशिवाय डिस्ने वर्ल्ड आणि डिस्ने सी वर्ल्ड, जपानमधील वक्तशीरपणा, विशेषत: त्यांची ती रेल्वे व्यवस्था - जगातील सर्वात वेगवान ट्रेन शिन्कानसेन (बुलेट ट्रेन) मध्ये प्रवास,, क्योटो येथील जपानी वाड्यांचा आणि किल्ल्यांचा प्रत्यक्षदर्शी अनुभव, टोयोटा कारखान्यात ऑटोमोटिव्ह आणि अभियांत्रिकी चमत्कारांचा अनुभव, ट्रेन-बस-केबल कार मार्ग आणि इलेक्ट्रिक बसचा वापर करून तात्यामा कुरोबे अल्पाइन प्रवास, लांब व्यापलेल्या स्थानिक बाजारपेठेतून फिरणे आणि ओसाका येथे खूप मोठ्या एलईडी स्क्रीनच्या पुढे उभे राहणे हे सगळे अनुभव घ्यायचे होते म्हणून आम्ही जपानला जायचं ठरवलं.
जपानची राजधानी टोकियो आणि एडिलेड जवळजवळ समान अक्षांशावर आहेत.डे -लाईट सेव्हिंग धरून जपान आणि एडिलेड मधील वेळेचा फरक साधारणतः अर्धा ते दीड तास असू शकतो.



आमच्या जपान प्रवासात खूप सुंदर अनुभव आले, परंतु त्यातले तीन अवीस्मरणीय अनुभव तुमच्यासमोर मांडत आहे.

जपानमधील सर्वात अविस्मरणीय अनुभव होता तातेयमा-कुरोबे अल्पाइन मार्गावरुन प्रवास करण्याचा. हा प्रवास केवळ डोळ्यांना सुखदायक निसर्गरम्य अनुभवच नाही तर एका हिमाच्छादित डोंगराच्या शिखरावर पोचण्यासाठी विविध परिवहन पद्धतींचा वापर करणाऱ्या जपानी अभियांत्रिकीच्या चमत्काराचे उदाहरण आहे.

तातेयामा कुरोबे अल्पाइन मार्ग नकाशा



लोकल मेट्रो ट्रेन आणि शिंकनसेन म्हणजेच बुलेट ट्रेनमध्ये जावून जपान रेल्वेचा अनुभव घेण्यासाठी टोकियोला भेट देण्याची दुसरी शिफारस आहे. डिस्ने सी वर्ल्ड हा दुसरा अनुभव जगात क्वचितच उपलब्ध आहे तर बऱ्याच शहरांमध्ये डिस्ने वर्ल्ड आहेत. टोकियोहून हाकोनेला एक दिवसाची सहल घेण्याची शिफारस केली जाते परंतु हे संपूर्णपणे हवामान आणि निसर्गावर अवलंबून आहे.

मी आवर्जून जावे असं सुचवत असलेलं तिसरे ठिकाण म्हणजे क्योटोला भेट देणे. क्योटो अतिशय पारंपारिक जपानी शहर आहे ज्यात प्राचीन जपानी संस्कृतीचा अनुभव घेणारी मुबलक मंदिरे, वाडे आणि किल्ले आहेत.

आता काही जाणवलेल्या अडचणी: - संवादासाठी इंग्रजीचा वापर केल्यामुळे काहीवेळा संवाद साधताना अडचण येत होती.

आम्ही शाकाहारी असल्यामुळे शाकाहारी अन्नाचा पर्याय शोधण्यातही अडचणी आल्या.

जपानी लोक मदतीस अतिशय तत्पर आणि अत्यंत नम्र आहेत. प्रवासादरम्यान मला नेहमीच हे पचवणं कठीण जात होतं, ह्याच सौम्य आणि सभ्य लोकांनी एकेकाळी पर्ल हार्बरवर हल्ला हल्ला करून विध्वंस केला होता. दोन अणुबॉम्ब, नियमित भूकंप, विनाशकारी त्सुनामी, फुकुशिमा आण्विक आपत्तीला सामोरे जावुन यशस्वी देश म्हणून जेंव्हा जपान परत परत उदयास येतो तेंव्हा ह्या देशाने किती भोगलं आणि सोसल आहे हे जाणवून त्यांच्या जिद्दीचं कौतुक वाटतं.

श्री. अजित देशमुख

आपण सर्वच सांगाती

थंडीचे दिवस होते. सकाळचे साडे-सात वाजलेत. त्याने पटकन अंगावर jumper चढवला. तो आरशासमोर उभा राहिला आणि विस्कटलेले केस बोटानी नीट करू लागला. कंगवा वापरण्याची त्याला गरज वाटत नव्हती कारण कंगव्याशिवायही केस विंचरले जाऊ शकतात ह्यावर त्याचा ठाम विश्वास बसला होता. त्याला थंडीही खूप आवडायची कारण चुरगलेला शर्ट जरी अंगात घातला तरी वरून jumper घातला कि काम झाला आणि दुसरं म्हणजे jumper घातल्यावर मॅचिंग कपडे घालावेच लागतात अशीही अट नाही.

"रेडी, निघूया का? त्याने प्रश्न विचारला.

मी कधीचा तयार आहे. तुलाच तयार व्हायला वेळ लागतो आज काल आणि तिच्या आधी पोचायचं म्हंटलं कि? मनानी तात्काळ उत्तर दिलं.

तो उचकला" लेक्चर देऊ नको रे. सकाळी सकाळी चालू नको होऊस.

"राहिलं! मन पुढे बोलू लागलं " आज काय परत तोच शर्ट, अरे तिसरा दिवस आहे. तो शर्ट बदलला असतास तर काही बिघडलं असतं का?

तो बोलू लागला" तुला काय करायचंय. मी शर्ट घालीन किंवा नाही घालणार नाहीतर आत टीशर्ट घालीन.

"ओके ओके कूल" मनानी विषय थांबवला.

'आज शुक्रवार म्हणजे casual वेअर! आज ती कुठला टॉप घालेल? रेड का ब्लू? त्याने अधीर होऊन मनाला विचारलं.

मन विचार करू लागलं" इनी, मिनी, मायनी मो. मला वाटतं आज रेड टॉप असेल विथ पोल्का डॉट.

'नाही मला वाटतं ब्लू टॉप असेल. मागल्या शुक्रवारी रेड होता' त्याने वाद घातला .

मनानी आठवण करून दिली 'नीट आठव जरा, मागले दोन शुक्रवार ती दिसली नव्हती . आपण उदास दिसत होतात.

त्याच्या काळजात चर्रर्र झालं" हो रे च्यायला. मी विसरून गेलो होतो. दोन शुक्रवार म्हणजे १५ तास काम कमी म्हणजे पंधरवड्याला पगार कमी मिळाला असणार तिला. स्वतःच्या पायावर धोंडा मारून घेईल एके दिवशी.

"अरे किती तारे तोडतोयस. तुला काय माहिती. ती गरीब असेल किंवा श्रीमंत! मन बोलून गेलं.

"गरीब कुठली. श्रीमंत आहे ती. मागे एकदा शनिवारी तिला तिच्या पंटर बरोबर पाहिलं होतं मी. गळ्यात गळे घालून चाले होते दोघे. एका हातात मायरची खरेदी आणि दुसऱ्या हातात लार्ज कॉफी कप होता. मी समोर आलो तर ढिम्म हसली सुद्धा नाही माझ्याकडे बघून. एव्हढं रोज प्रवास करतो आम्ही. बघून हस तरी" तो हळहळला.

"ती नाही हसली म्हणजे तुला ओळखलं नसेल तिनी" मनानी नकळत तिची बाजू घेतली.

"ओळखलं नसेल काय? हाच jumper घातला होता मी" तो बोलून गेला.

'विकेंडला तरी जंपर बदलत जा रे ! बदल केलास तर हि काय अनेक मुली देतील स्माईल' मनानी जाताजाता सल्ला दिलाच.

तेवढ्यात त्याला लांबून बस येताना दिसली. तिचा मात्र पत्ता नव्हता. बस जशी जवळ येऊ लागली तशी त्याची धाकधूक वाढली. मोठ्या निराशेनी तो बस मध्ये चढला.

'गुड मॉर्निंग' बस ड्रायव्हरनी स्वागत केलं.

'मॉर्निंग' त्याने त्रोटक उत्तर दिलं.

'ती नाही आली तर राग ड्रायव्हरवर का? मनानी हळूच विचारलं.

तो चालता चालता “चूप बैस” इतकंच म्हणाला आणि बसायला जागा शोधू लागला.

'ह्या एअरपोर्टवरून येणारी बस पकडली कि वैताग असतो. केवढ्याला बॅगा असतात ह्या स्टुडंटच्या' त्याच्या मनात विचार येऊन गेला.

'हो जणू तू पहिल्यांदा Adelaideला आलास तेव्हा एअरपोर्टवरून टॅक्सी केली होतीस' मनानी निषेध नोंदवला.

त्याने मनाशी जास्ती वाद घातला नाही आणि तो सीट शोधू लागला. एका सिटपाशी तो क्षणभर घुटमळला आणि एका लव्हेंडर परफ्युममुळे क्षणभर थबकला आणि त्याला एकदम ती एका सीटवर बसलेली दिसली. त्याला खूपच आनंद झाला पण ती भावना लपवत तो अगदी शेवटच्या सीटवर जाऊन बसला.

"अरे ही आधीच्या स्टॉपवर चढली म्हणजे! घर बदललं कि काय हिनं? किती स्टॉप लांब राहायला गेली देव जाणे??" त्याने विचारायला सुरुवात केली.

“लांब गेली असती रहायला तर मग इतर दिवशी रोज ह्या स्टॉपवर चढेल का? आणि ते जाऊ दे, मला सांग? घातलाय कि नाही तिनी रेड टॉप? पोल्का डॉट्स पण आहेत" मनानी हसत हसत विचारलं.

'चुकलो माफ कर मला' त्याने कबुली दिली.

'चल आता मी थोडी विश्रांती घेतो, तू तिच्याकडे बघत रहा आणि अधूनमधून इतरांकडेही बघ' मनानी एक फ्री सल्ला दिला.

तो आता उजळणी करू लागला. आता हि पुढला स्टॉप येईस्तोवर पर्स मधून हळूच एक जाड पुस्तक काढेल. पुस्तकातील खूण सगळ्यात मागल्या पानात खोचेल आणि मग पुस्तक वाचायला घेईल. दोन पानं उलटली कि केसांची बट मागे घेईल. पुस्तक वाचून झालं कि मग डाव्या हातातल्या wrist watch कडे बघेल आणि मग मानेला झटका देईल.

तो जसा विचार करत होता अगदी तसं घडतं होतं.

'हे पुस्तक बरंच मोठं दिसतंय. बरेच दिवस वाचत्ये ही. पुस्तक मोठं आहे कि आजकाल वाचनाचा वेग मंदावलाय हिचा देव जाणे' त्याने उगीच कारण शोधण्याचा प्रयत्न केला.

फावल्या वेळात तिच्या मागील सीटवर बसलेल्या माणसाकडे आता त्याचं लक्ष गेलं. ते काका न्यूजपेपरमधील सुडोकू सोडवत बसले होते.

तो मनाशी बोलू लागला "हा माणूस हुशार असणार हं! साला पुढला दोन स्टॉप येण्याआधी ह्याचं सुडोकू सोडवून झालं असेल बघ. सुडोकू झालं कि हा कार्टून वाचायला घेईल आणि तिसऱ्या स्टॉपवर पेपर घडी करून ह्याच्या बॅगमधील झिपच्या कप्प्यात पेपर ठेवेल. तुला काय वाटतं रे?

“आता कुठे डोळा लागला होता माझा. जाऊ दे तू काही झोपून द्यायचा नाहीस. हा ते काका नं. हो ते हुशार असणारंच. चेहेराच सांगतो त्यांचा सगळं काही. तुझ्या अगदी विपरीत आहे नाही का?" मनानी त्याला टोचल.

तो उखडला " ए एकतर आपल्याला सुडोकू बिडोकू वगैरे आवडत नाही हं. उगाचची आकडेमोड. ऑफिसमध्ये नंबर्सशी खेळतो ते पुरे आहे”.

"अरे, मी तुझ्या नीटनेटकेपणाबद्दल बोलत होतो. चिडू नकोस" मनानी त्याला शांत केलं.

तेवढयात त्याचं लक्ष तिच्या शेजारी बसलेल्या निळ्या डोक्याकडे गेलं. तो तिला नीट निरखू लागला. तिची ओळख पटल्यावर त्याने आता मोर्चा तिच्याकडे वळवला . "अरेच्या हिने परत केस रंगवले वाटतं".

मन निर्विकार बसलं होतं हे पाहून त्याला अजूनच चेव चढला.

" अरे हि बया ओळखली नाहीस का? मागल्या महिन्यात हिचे केस तपकिरी होते. आठवली का? पूर्वी पर्समधून एक छोटासा आरसा काढायची आणि मग मेकअप करायची. आय लायनर, लिपस्टिक, मस्करी”.

"मस्करी नाही रे, मस्कारा" मनानी लगेच त्याची चूक सुधारली.

"तेच ते, मस्कारा! कशाला पाहिजे तो मेकअप. पापण्यांनां मेकअप, डोळ्यांवर मेकअप, भुवयांवर रंग, ओठांचा चंबू करून त्यावर लिपस्टिक. इतके रंग कि जणू रंगपंचमीच खेळणारे. तो विनाकारण फुत्कारला.

“तिला चांगलं वाटतं असेल नं केसांचा रंग बदलल्यावर" मनानी तिची बाजू घेतली आणि हा उखडला "घ्या ! तुम्ही नेहेमी दुसऱ्याचीच बाजू घ्या".

आता शहराच्या अगदी जवळ बस येऊ लागली होती. जेमतेम शेवटचे दोन स्टॉप राहिले होते.

तेवढ्यात पुढला बस स्टॉप आला आणि त्याला जाणवलं कि ड्रायव्हर कुठल्या तरी काळ्या गॉगलशी हुज्जत घालतोय. काळा गॉगल अत्यंत बेदरकारपणे पुढे चालत आला आणि ह्याच्या शेजारी येऊन बसला. त्याच्या हातावर भलंमोठठं टॅटू होतं. केस कपाळापासून अगदी डोक्याच्या मध्यापर्यंत कापलेले आणि मागे मोठा पोनी होता. ह्या थंडीतही त्यानी खाली शॉर्ट घातली होती आणि पायावर वळ दिसत होते.

ह्यानी हळूच पाहिलं आणि लगेचच त्याला ओळखलं. "शी ! हा राऊडी चेन स्मोकर आलाच का माझ्याशेजारी तडमडायला. हा फुकट्या कधीच तिकीट काढत नाही. मी असतो नं ड्रायव्हर तर ह्याला दाखवलं असतं.

"अरे तू कशाला पेटतोयस. आपल्याला काय करायचंय? आपण काढलंय नं तिकीट. लक्ष नाही द्यायचं. आपल्या हातात सर्व गोष्टी थोड्याच असतात" मनानी शांत करायचा प्रयत्न केला.

तरीही तो बरळू लागला " अरे वा ! लक्ष नाही द्यायचं म्हणजे काय? टॅक्स आम्ही पे करणार. बस आमच्या टॅक्स वर चालते. आणि हे फुकटे विनातिकीट प्रवास करणार. चालायचं नाही हे. मी उद्या मीडियाकडे जाईन नाहीतर पार्लमेंटला जाईन.

हा संतापल्यामुळे ह्याची चूळबूळ चालू झाली. ह्याच्या चूळबुळीमुळे थोडी सीट हलू लागली. काळ्या गॉगलनी त्याचा गॉगल कपाळावर सरकवला आणि स्वतःला साजेश्या अत्यंत घोगऱ्या आवाजात विचारलं " आर यू ओके ? वॉन्ट सम वॉटर?

त्याचे डोळे पाहूनच त्याची गाळण उडाली आणि एकदम शांत झाला.

काळ्या गॉगलला थोड्या वेळानी कुणाचा तरी फोन आला आणि त्याने जोरदार आई, माई, फ, बास ने चालू होणाऱ्या सर्व शिव्यांची उजळणी केली.

त्याला आठवलं कि आज सकाळी गडबडीत स्तोत्र म्हणायचं राहून गेलं होतं. आता मात्र तो देवाकडे धाव घेऊ लागला आणि बस टर्मिनलची वाट पाहू लागला.

"तरी सांगत होतो, शांत रहा" मन हलकेच कुजबुजलं.

म्हणता म्हणता बस टर्मिनल जवळ आलं आणि बस थांबल्यावर सर्व प्रवासी उतरून आपापल्या दिशेला वळले.

हा बसमधून उतरला आणि ऑफिसच्या दिशेला जाऊ लागला. अक्षरशः बाग ओलांडली कि पलीकडे ह्याचं ऑफिस. बागेतून जाताना नेहेमीच्या कारंज्यापाशी आला आणि एका बाकावर बसला. त्याला तशी ऑफिसची बिल्डिंगही दिसू लागली होती त्यामुळे तो थोडा निवांत होता. बसमधला,

शहरातला कोलाहल कुठेतरी दूर पळून गेला होता परंतु आता त्याची जागा एकटेपणानी घेतली.

"उदास का तू, आवर वेडे" त्याचं मन गीतरामायणातील एक गीत गाऊ लागलं.

तो उचकला " ए चेष्टा नकोय हं. प्रत्येक गोष्टीवर जोक नकोय".

"बरं बरं कूल. काय झालं एकदम? गप्पा का झालास?" मनानी त्याला विचारलं.

काही नाही रे, इथे ऑस्ट्रेलियात आलो खरा लौकिकार्थाने सर्व काही मिळवलं पण आपलं असं जवळचं कुणीच वाटत नाही ज्याच्याबरोबर दोन शब्द बोलता येतील, काही शेयर करता येईल असं कुणीच नाही. आता ऑफिसला गेलं कि तेच तेच लोक, तेच ते विषय, तेच राजकारण आणि तीच चढाओढ आणि जीव घेणी स्पर्धा.

"च्यामारी! म्हणजे तू मला मित्र समजत नव्हतास इतके दिवस" मनानी उसनं अवसान आणलं

आणि ते पुढे बोलू लागलं " मजा करतोय तुझी. आता ऐक! आपण सर्व जण अवती भवती ज्या गोष्टी बघतो त्यावर सतत विचार करत असतो कित्येकदा त्यावर शेरे ओढत असतो पण ह्या सगळ्या गोष्टींमध्ये जे हे एक 'वाटणं' प्रकार असतो नं तो सगळी वाट लावतं.

तो बुचकळ्यात पडला.

मन समजावू लागलं " आता इतरांचं सोड. आपण तुझा फक्त विचार करू. तू सकाळी बस स्टॉप वर तिची वाट पहात बसलास नं? जेव्हा तू तिला पाहिलं नाहीस तेव्हा त्या ड्रायव्हरकडे बघून हसला नाहीस पण जेव्हा तिच्या परफ्युमचा वास आला तेव्हा तू हसलास आणि मग तर तूला शेवटच्या सीटवरचे धक्केही जाणवले नाहीत. हो नं? हे सगळं त्या वाटण्यामुळे होतं.

आता समोर बघ ह्या व्हील चेयर वर बसलेला माणूस बघ. त्याला माहीत्ये कि तो कायमचा व्हील चेयरला जखडून बसलाय पण त्याच्या चेहऱ्यावर दुःख दिसतंय का?

त्याने पाहिलं तर तो माणूस खरंच प्रसन्न मुद्रेनी ब्रेडचे तुकडे बदकांना देत होता.

"पण तोही उदास होतंच असेल कि" त्याने प्रश्न विचारला.

"उदास प्रत्येकजणंच होत असतो. माझं म्हणणं एवढंच आहे कि आपल्या कुठल्याही भावनेचा परिणाम पुढल्या गोष्टीवर होऊ द्यायचा नाही. जर असं झालंच तर तुला एकाकीपणा जाणवणारच नाही. आता दुसरं म्हणजे तुझ्या रोजच्या प्रवासातले हे सर्व अनोळखी लोकं तुझे सांगातीच मानलेस तर मग कोण आपले आणि कोण परके? हे लोकंच तुझ्या रोजच्या जगण्यामध्ये विरंगुळा आणतात त्यामुळे त्यांच्यावर चिडचिड करून कशाला वेळ वाया घालवतोस. ह्यांना एकदा आपलं मानलंस तर कदाचित मग तुला माझीही गरज पडणार नाही" मनानी हसत हसत उत्तर दिलं.

त्याला मनाच्या बोलण्यातलं तथ्य जाणवलं आणि तो विचार करू लागला.

"बाय द वे, घड्याळात वाजलेत बघ किती? उगीच उशीर नको व्हायला ऑफिसला जायला. शुक्रवार आहे म्हणून इतकी पण लिबर्टी नको" मनानी त्याला ताळ्यावर आणलं.

त्यानी एकदम घड्याळात बघितलं आणि तो ऑफिसकडे झपाझप जायला निघाला. जाताना चक्कचक्क त्यानी व्हीलचेयर वरच्या अनोळखी माणसाला टाटा केलं आणि त्याच्याकडे बघून हसला सुद्धा.

श्री. समीर परांजपे

माझा मित्र – राम

मेल बाॅक्समध्ये अंतरदेशीय पत्र आणि तेही एका शाळकरी मित्राकडून - रामकडून - आलेले पाहून मन एकाच वेळी आनंद, आश्चर्य आणि उत्सुकता यांनी भरून गेलं. घरांत येऊन घाईघाईने पत्र उघडून वाचायला सुरवात केली. पत्र मिळायला तसा थोडा जास्तच वेळ लागला होता. पत्रात त्याने लिहिले होते की तो आणि त्याची बायको आता वसईला दोन खोल्यांच्या जागेत रहायला गेले आहेत. पत्र वाचून झाले आणि त्यांवर विचार करत असतानाच माझ्या दुसऱ्या शाळकरी मित्राचा फोन आला व त्याने आजच सकाळी हार्ट अ‍ॅटॅकने राम गेल्याची दुःखद बातमी सांगितली. काय योगायोग पहा आताच कुठे मी रामचा, आमच्या मैत्रीचा, आम्ही एकत्र घालवलेल्या काळाचा विचार करत असतानाच तो आता आमच्यांत नसल्याची खबर मिळावी.

मन त्वरेने पंचावन्न वर्षे मागे धावले. राम, राजा, आनंद आणि मी - चौघेजण आम्ही एकाच चाळीत रहाणारे, एकाच शाळेत जाणारे आणि साधारण एकाच वयाचे. तीन वर्षांपूर्वी आनंद हे जग सोडून गेला आणि आता रामही त्याला भेटायला निघून गेला. पाण्यानी भरलेल्या माझ्या डोळ्यांसमोर रामचे जीवन दिसू लागले. आम्ही रहायचो त्या भागांतच रामच्या वडिलांचे स्टेनलेस स्टीलची भांडी, स्टेशनरी आणि शोभेच्या वस्तू विकण्याचे दुकान होते. उत्तम दर्जाचा माल विकणारे, अतिशय स्वच्छ आणि नीटनेटके अशी दुकानाची ख्याती होती. दुकानांत काम करणारे कामगारही स्वच्छ आणि विनम्र वागणुकीचे होते. रामच्या वडिलांचे कामगारांबरोबर सलोख्याचे नाते होते. राम फक्त सतरा वर्षाचा असताना दुर्दैवाने त्याच्या वडिलांचे निधन झाले आणि रामवर कुटुंबप्रमुख आणि दुकानाचा मालक अशा दोन्ही जबाबदाऱ्या एकदमच येऊन पडल्या. वयाने लहान आणि अननुभवी रामला मदत करण्या ऐवजी नातेवाईकांनी रामच्या कुटुंबाला अक्षरशहा: लुटले. रामच्या वडिलांच्या चांगल्या चांगल्या वस्तू त्यांनी लंपास केल्या आणि रामकडे आणि त्याच्या कुटुंबाकडे कायमची पाठ फिरवली.

नुकतेच सुरू केलेले विद्यापिठातले शिक्षण सोडून, रामला विना अनुभवाचा धंदा - दुकान - चालवणे भाग पडले. अनुभवी, कुटुंबाबद्दल काळजी वाटणारे आणि योग्य तो सल्ला देणारे अशा कोणाचे पाठबळ नसल्याने दुकानावर व्हायचा तोच परिणाम झाला. एकेक करत दुकानात काम करणाऱ्यांनी रजा घेतली आणि आर्थिक परिस्थितीही उत्तम वरून जेमतेम वर आली. रामच्या सच्च्या, आनंदी आणि दिलदार स्वभावांत मात्र याने काहीही फरक पडला नाही.त्याच्या दुकानासमोरच फूटपाथवर काही बारीक सारीक गोष्टी विकणाऱ्याने रामला सल्ला विचारला की आणखी काय वस्तू त्याने आणाव्यांत म्हणजे त्याचा खप जास्त होईल. रामने सुचवल्याप्रमाणे त्या माणसाने दोनशे रुपये खर्चून त्या वस्तू आणल्या परंतु त्या काही विकल्या गेल्या नाहीत. आपल्या सल्ल्यामुळे या माणसाचे नुकसान झाले याचे रामला फार वाईट वाटले व त्याला मदत म्हणून पुढचे काही दिवस त्याच्या जेवणाचा खर्च रामने केला.

रामच्या दुकानाची पाटी- दुकानाचे नांव - इंग्लिश मध्ये लिहिलेली होती. शिवसेनाची सत्ता आल्यावर त्यानी सर्व दुकानाच्या पाट्या देवनागरी लिपीत असण्याची सक्ती सुरू केली. त्याप्रमाणे शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी दुकानांत येऊन रामला सांगितले की तुमची नांवाची पाटी बदला नाहीतर आम्ही ती खाली काढून जाळून टाकू. रामने तात्काळ त्यांना काड्याची पेटी काढून दिली व सांगितले की काही हरकत नाही. जाळून टाका पाटी. नाहीतरी दुकान चालत नाहीच त्यामुळे पाटी असण्या नसण्याने काही फरक पडणार नाही. कार्यकर्ते या अनपेक्षित उत्तराने गोंधळले आणि काहीच न करता निघून गेले. इतर दुकानांच्या देवनागरी लिपीतील पाट्यांमध्ये रामच्या दुकानाची एकमेव इंग्लिश पाटी उठून दिसायला लागली.

राम स्वभावाने स्पष्टवक्ता, चटकन संतापणारा पण तितकाच आपली चूक कळली की पटकन साॅरी म्हणणारा.आम्ही रहायचो तेथे जवळच एक बेकरी होती. त्यांची बिस्कीट्स फार छान असायची. एकदा माझा धाकटा भाऊ बेकरीत बिस्कीटे आणायला गेला होता. त्याच्या आधी रामने ही बिस्कीटे विकत घेतली होती, पैसे दिले होते पण बेकरीवाला म्हणत होता की उरलेले पैसे द्यायला त्याच्या कडे सुटे पैसे नाहीत. तेव्हढ्यासाठी राम तेथेच थांबला होता. माझ्या भावाने बिस्कीटांचे पैसे दिल्यावर बेकरीवाल्याने ताबडतोब त्याला उरलेले सुटे पैसे परत दिले. हे सर्व रामच्या समोरच झाल्याने

राम चिडला आणि बेकरीवाल्याला म्हणाला तो माझ्यापेक्षा श्रीमंत म्हणून त्याला सुट्या पैशांसाठी न आडवता उरलेले पैसे परत दिलेत हे तुमचे करणे बरोबर नाही. असे बोलून राम बेकरीतून निघाला आणि पुढे जाऊन माझ्या भावासाठी थांबला. आपल्याला माझ्या भावाचा अनादर करण्याचा कोणताही हेतू नव्हता पण बेकरीवाल्याने असा दुजाभाव न करता सर्वांना एकच नियम लावायला हवा असे म्हणून रामने माझ्या भावाची क्षमा मागितली.

माझ्या प्रत्येक भारतभेटीत मी रामला भेटून त्याच्याबरोबर वेळ घालवत असे. अशाच एका भेटीत, मी पुण्याला माझ्या दुसऱ्या भावाकडे असताना राम मला भेटायला आला. बेल वाजली म्हणून दार उघडले तो समोर राम पावसांत चिंब भिजलेला, पाय, कपडे चिखलाने भरलेल्या अवस्थेत उभा. आत यायला तयार नाही कारण फरशी घाण होईल व माझ्या वहिनीला ती साफ करण्याचे कष्ट पडतील. दारांत उभ्या उभ्याच त्याने मला आपल्या मुलाच्या लग्नाचे आमंत्रण दिले. पत्रिका कुठे आहे म्हटल्यावर म्हणाला, तुम्ही काही लग्नाला ऑस्ट्रेलियांतून येणार नाही मग एक पत्रिका वाया कशाला घालवायची म्हणून तुम्हाला पत्रिका देत नाही. पण तुमच्या भावांकडून माझ्या मुलाचे लग्न झाल्याचे तुम्हाला कळेल व मी तुम्हाला कळवले नाही म्हणून तुम्ही माझ्यावर रागावल म्हणून सांगायला आलो. मला तो का कोणास ठावूक नेहेमी अहो म्हणायचा.

नंतर एकदा राम कालनिर्णय विकताना मला दिसला. मी त्याच्याकडून दोन कॅलेंडर्स घेतली व त्याने सांगितल्याप्रमाणे पन्नास रुपये त्याला दिले. थोडा वेळ आम्ही गप्पा मारत उभे होतो तेव्हढ्यात आणखी एकांनी त्याच्याकडून एक कालनिर्णय घेतले व त्याला दहा रुपये दिले. हे पाहून मी त्याला म्हटले मला तू पंचवीस रुपयाला एक प्रमाणे दिलेस ह्यांना दहा रुपयाला असे कसे? त्यांवर त्याने खुलासा केला की तुम्ही आस्ट्रेलियात रहाता तुम्हाला पंचवीस रुपये जास्त नाहीत पण हे इथलेच त्यांना ते जास्त होतील, परवडणार नाहीत.हे सर्व त्या गृहस्थांसमोरच.

राम साधारण तिशीत असताना त्याचे लग्न झाले व त्याला दोन मुलगे झाले. दोन्ही मुलांना त्याने चांगल्या प्रकारे वाढवले, शिक्षण दिले. दुकानाची जबाबदारी मोठा मुलगा घेऊ लागला तसे राम आणि त्याची बायको धाकट्या मुलाकडे पुण्याला रहायला आले. डायबेटिस मुळे रामची तब्येत खालावली. गँगरिनमुळे त्याचा गुडघ्यापासून खालचा पाय कापावा लागला. काही तरी बिनसाबिनसीमुळे स्वाभिमानी रामने मुलाचे घर सोडले आणि तो व त्याची बायको वसईला रहायला आले. तेथेच त्याने शेवटचा श्वास सोडला.

आज त्याच्या आठवणीने एक निष्पाप, निस्वार्थी, स्पष्टवक्ता आणि सच्च्या दिलाचा मित्र गमावल्याचे दु:ख होते पण त्याचा उल्लेख निघाला की आठवतात त्या त्याच्या स्पष्टवक्तेपणामुळे घडलेल्या गंमतीशीर घटना आणि कैक वर्षे तोंडांत फक्त एकच दात असलेला, त्याचा सदैव आनंदी चेहरा.

(श्री. **दिलीप चिरमुले यांच्या मित्राचे सौ.कालिंदी चिरमुले यांनी केलेले शब्दांकन**)

राग-संगीताच्या दुनियेत डोकावताना

(संगीत अलंकार डॉ. अपर्णा गुरव ह्या विदुषी (स्व.) वीणा सहस्रबुद्धे ह्यांच्या शिष्य असून त्यांनी डॉ.विकास कशाळकर ह्यांच्याकडूनही मार्गदर्शन घेतले आहे. सुधा पटवर्धन ह्या त्यांच्या पहिल्या गुरू. सध्या त्यांना डॉ. दिग्विजय वैद्य ह्यांचे मार्गदर्शन मिळत आहे. त्यांच्या गायनकौशल्याबद्दल त्यांना विविध शिष्यवृत्या आणि पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.त्यांनी स्व. सवाई गंधर्व ह्यांच्या जन्मगावी कुंदगोळला सवाई गन्धर्व महोत्सवात गायन केले आहे. त्याशिवाय अन्य अनेक कार्यक्रमात आपल्या गायनाने वाहवा मिळवली आहे.)

"ए-आई, मला कुठलं तरी सिनेमाचं गाणं शिकव ना! काहीतरी गा म्हटलं, मी मला तुझ्या बंदिशीच आठवतात. मग माझ्या मैत्रिणी म्हणतात, ते आऽऽ ऊऽऽ गाऊ नकोस हं, काहीतरी वेगळं गा!"
माझी १४-१५ वर्षांची लेक जेंव्हा मला हे सांगत आली, तेंव्हा मीही विचारात पडले. अरेच्चा! खरंच की, तिच्या मैत्रिणींना आपल्या घरातल्यासारखं सांगीतिक वातावरण नाहीच की, मग त्यांना त्याची गोडी काय समजणार? यावर तिला मी एक छोटासा प्रयोग करायला सांगितला. म्हटलं, "श्रुती, तू भीमपलास रागातली 'जा जा रे अपने मंदिरवा' ही बंदिश खूपदा ऐकलीयेस, पण मग "राधा कैसे न जले" (लगान) किंवा "पानी दा रंग वेखके" (विकी डोनर) ही गाणी तू आधी भीमपलासाची बंदिश गाऊन, त्याला पुढे जोडून का नाही ऐकवत त्यांना? बघ त्यांना आवडतंय का? त्या निमित्ताने का होईना, तुला येत असणाऱ्या बंदिशींशी, त्या धूनशी साम्य दर्शवणारी गाणी कुठली, अशासारखा एखादा छानसा खेळ (तुमच्या भाषेत timepass) ही होऊ शकतो"

या प्रसंगानंतर ती आणि तिच्या मैत्रिणी अनेकदा आमच्याकडे येऊन मी विद्यार्थिनींना शिकवत असताना त्या धून, बंदिशी ऐकायला लागल्या, गाणी शोधायला लागल्या, आणि तिच्या एका मैत्रिणिने तर 'काकू, मला आता तुझ्याकडे गाणं शिकायचंय, हे स्वर काय आहेत, हे माहिती करून घ्यायचय' असं म्हटल्यावर, मला अगदी कृतकृत्य वाटलं. बऱ्याचदा सामान्य लोकांना शास्त्रीय संगीत म्हणजे रुक्ष, क्लिष्ट, कंटाळवाणं, ठराविक लोकांना आवडणारं. असं वाटत. त्यांची याबाबत अगदी स्वाभाविक अशीच प्रतिक्रिया असते. पण असं का, तर त्यांना त्याची गोडी, त्यातला आनंद कळलेलाच नसतो. त्या वाटेला ते कधी गेलेलेच नसतात. त्याचे संस्कार त्यांच्यावर कधी झालेलेच नसतात.

तसं पाहायला गेलं, तर वारंवार सहजपणे ऐकल्या जाणाऱ्या सिनेसंगीत, भावसंगीत वगैरे प्रकारांमध्येही या शास्त्रीयसंगीताचा पाया (बेस) असतोच बरं का! कुठल्या ना कुठल्या 'धून' वरून किंवा एखाद्या रागावर आधारित अशा ज्या रचना आहेत, त्या पुन्हापुन्हा मनात रुंजी घालत राहतात. कारण त्याच्यातील 'मेलडी' ची ताकद. स्वरसंवादातून बनलेल्या आपल्या संगीताची, भावना व्यक्त करण्याची हीच ताकद मदनमोहन, सी रामचंद्र, नौशाद इत्यादी अनेक संगीतकारांनी चित्रपटसंगीतातून अत्यंत प्रभावी व समर्थपणे वापरली. काही गाण्यांमध्येतर अक्षरशः त्या-त्या रागाची SingnatureTune म्हणावी अशी स्वररचना - जिला आमच्या शास्त्रीय-संगीताच्या भाषेमध्ये आम्ही 'पकड' म्हणतो - ती सुंदरपणे गुंफलेली दिसते. राग ओळखावे कसे, असा प्रश्न अनेकदा श्रोत्यांना पडतो. त्यादृष्टीने ही 'पकड' फारच महत्वाची भूमिका बजावते. या दृष्टीने आपण राग-संगीताकडे पाहू लागलो, तर फारच उदबोधक गोष्टी आपल्या लक्षात येऊ लागतात. विविध कालखंडात संगीत दिलेली गाणी पाहता, एकच धून नव्या-जुन्याच्या संगमातही आपलं अस्तित्व टिकवून असलेली पाहायला मिळते. उदाहरणच द्यायचं झालं तर, अलीकडची 'ये लाल इष्क' (रामलीला), ये मोह मोह के धागे (दम लगा के हैशा) समर्थपणे 'यमन' चं दर्शन घडवत असतात. हि गाणी गातानाही शास्त्रीय-संगीतातला 'यमन' ऐकताना लागेल अशी तंद्री एखाद्याला लागू शकते. जुन्या काळातील 'कही ये वो तो नही' (हकीकत), 'आंसू भरी है ये जीवन की राहे' (पर्वरीश) या सारखी गाणीही आजच्या काळातील धूनशी साधर्म्य सांगतात, तेंव्हा राग-संगीताच्या या विस्तारक्षम ताकदीचा प्रत्यय येत राहतो.

राग-संगीताची आवड जोपासताना, जसं अशा गोष्टींमधलं कुतूहल उपयोगी पडत, तसंच 'ऐकत-राहण्याचा रियाज' थोडाफार करत राहणंही आवश्यक असतं. अनेक श्रोते आम्हाला सांगतात, ऐकायला आवडतं हो, पण कळत नाही हो! पण त्यासाठी अशी थोडी पूर्वतयारी

करावीच लागते. प्रत्येकाच्या स्वभावधर्मानुसार, मूळ आवडीनुसार किंवा संगीत ऐकण्याच्या संस्कारानुसार त्या त्या धाटणीचे संगीत लोकांना आवडत असते. त्यातूनच भावगीत, भक्तीगीत, लोकसंगीत, सुफी किंवा ठुमरी, दादरा,चैती, होरी, कजरी यासारखे उपशास्त्रीय-संगीत किंवा अगदी शास्त्रीय-संगीत ऐकणारे असे विविध शैलीचे श्रोते निर्माण होत असतात. पण या सर्वांचं मूळ आपल्याला राग-संगीतात सापडतं. दिवसाच्या वेगवेगळ्या वेलांना आपल्या स्वतःच्या आंतरिक उर्मीने आपल्याला कुठलं संगीत कधी ऐकावंस वाटतंय, हे बघणेही मनोरंजक ठरतं.

आंतरजालाच्या (internetच्या) किमयेमुळे आता कुठलीही माहिती एका 'बोटावर' उपलब्ध आहे. त्यातून अगदी शास्त्रीय, क्लिष्ट माहिती न बघताही, सहज म्हणून काही रागांची नावं नजरेखालून घालणं, त्यावरील आधारित गाणी शोधणं, त्या गाण्याच्या धूनचा त्याच रागाच्या एखाद्या बंदिशीत मागोवा घेणं, हे सहज म्हणून फावल्या वेळात करायचे 'उद्योग' तुमची सांगीतिक जाण वाढवायला मात्र नक्कीच मदत करतात. जरी एखादा राग पूर्ण तासभर - अर्धातास ऐकायची सवय लगेच होणं अवघड असलं, तरी काही जुन्या कलाकारांच्या (उदा. - डी व्ही पलुस्कर, अब्दुल करीम खां, फैयाज खां, मोगुबाई इ.) एलपीच्या काळातली ३ किंवा ५ मिनिटांची ध्वनिमुद्रण ऐकणं, हा ही एक चांगला पर्याय होऊ शकतो. आणि मग हे थोडंसं 'ऐकणं' आपली 'ऐकण्याची' भूक वाढवू लागलं, तर मात्र राग-संगीतात डुंबायची तुमची तयारी आपोआप वाढू लागते.

आजकालच्या ताणतणावाच्या आयुष्यात, वाढलेल्या वेगामुळे अनेक 'निवांत' अनुभवांना आपण मुकतोय. आपल्या पुढच्या पिढीला या 'निवांत' क्षणांची जरुरी जास्त जरुरी भासणार आहे. सतत व्यवहारी जगाशी जुळवून घेताना, भावनाशून्य होत जाण्याची भीती, एकलकोंडे होऊन फक्त 'स्वकेंद्रि' वृत्तीत होणारी वाढ, शाळांमध्ये सर्वसमावेशक हवी असणारी वृत्ती तयार न होणं किंवा एकाग्रता साधता न येणं अशा अनेक समस्यांना आजचे पालक तोंड देत आहेत. त्यादृष्टीने शास्त्रीय-संगीताची ताकद वेळीच समजून त्यादृष्टीने एक 'विचारी आणि संतुलित व्यक्ती' बनण्यासाठी संगीत एक माध्यम बानू शकते.

यासाठी संगीताच्या या तरल आणि भावनात्मक दुनियेची ओळख जर मुलांना लहानपणीच करून दिली तर 'सुरांच्या' हिंदोळ्यावर त्यांच्या जीवनाची नौका नक्कीच डौलाने चालेल.

अपर्णा गुरव

(मराठी टायपिंग - श्री.रघुनाथ पवार - ब्रिस्बेन)

विश्वास सोहोनी नाट्य महोत्सव

मराठी माणसासाठी नाटक हे त्याच्या आयुष्यात किती महत्वाच्या स्थानी आहे हे मी काही नव्याने सांगायला नको. विष्णुदास भावे यांच्या सीता स्वयंवर ते सध्या बहुचर्चेत असलेलं मामा वरेरकर लिखित आणि विश्वास सोहोनी दिग्दर्शित भूमिकन्या सीता अशी आज पर्यंत हजारो नाटक मराठी रंगभूमीवर नाट्यरसिकांसाठी नाट्यकर्मींनी सादर केली. त्यात वेगवेगळे विषय हाताळले गेले जे सामाजिक बांधिलकीचे असोत, ऐतिहासिक असोत किंवा पौराणिक असोत, नाट्यनिर्मितीचा मूळ उद्देश हा सदैव मनोरंजना बरोबरच समाज प्रबोधन किंवा एखादा चांगला विषय लोकांसमोर सोप्या पद्धतीने मांडणे हाच होता. त्यामुळेच मराठी रसिकांनी आजवर नाटकांवर भरभरून प्रेम केलं.
आजही या संगणक युगात, घरात टीव्ही, हातात सोशल मीडिया - स्मार्टफोन असूनही मराठी नाटकाला गर्दी हि होतेच. कारण मराठी माणूस आणि नाटक यांचं एक अतूट नातं आहे. मी स्वतः देखील नाटकावर खूप प्रेम करतो. मी अगदी बालवाडी मध्ये आणि बालवयापासून वार्षिकोत्सवामध्ये नाटकात काम देखील केलं. पुढे कॉलेजला गेल्यावर आंतर महाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेत भाग घेतला. तिथे 1993 ला सर्वोत्कृष्ट अभिनेता हा पुरस्कार मिळाला. त्या नंतर टीव्ही सिरिअल्स, रिऍलिटी शोज विनर, बॉलीवूड सिनेमाज आणि हॉटेल मुंबई मध्ये हॉलिवूड च्या दिग्गजांसोबत काम देखील केलं. परंतु नाटकात काम करण्याची खुमखुमी, तुम्ही खाज म्हणा हवं तर, काही जात नव्हती. आणि म्हणूनच मी आपल्या अडेलैड, ऑस्ट्रेलिया मध्ये द अडेलैड नाटक कंपनी तर्फे नाट्य महोत्सव साजरा करतोय. विश्वास सोहोनी नाट्य महोत्सव. यात मी दोन वेग वेगळ्या एकांकिका सादर करतोय.
विश्वास सोहोनी नाट्य महोत्सव मध्ये सादर होणारी नाटके हि मराठी सिने नाट्यसृष्टी मधील प्रख्यात लेखक दिग्दर्शक श्री विश्वास सोहोनी यांनी लिहिलेली आहेत. विश्वास सोहोनी म्हणजे विनोदी नाटकाचं खणखणीत नाणं. आज पर्यंत त्यांनी बरीच नाटके लिहिली आणि दिग्दर्शित केली. त्यासाठी त्यांना इंडियन नॅशनल थेटर, युथ फेस्टिवल, उन्मेष, मृगजळ आणि इतर राज्य पातळीवर अनेक पारितोषिके मिळाली. सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक ते सतीश दुभाषी सर्वोकृष्ट अभिनेता, सर्वोकृष्ट नेपथ्य ते सर्वोत्कृष्ट प्रकाश योजना... काय काय सांगू. फु बाई फु आणि टिकलं ते पोलिटिकल या विनोदी मालिकांसाठी Creative Director म्हणून काम केले. डोंबिवली फास्ट, कायद्याचं बोला, कमीने, आंख मिचोली अशा हिंदी मराठी चित्रपटात काम केले. परंतु सगळ्यात महत्वाचं म्हणजे त्यांनी रंगभूमी व चित्रपट सृष्टीमध्ये अनेक गुणी कलाकार घडवले. पुष्कर श्रोत्री, समीर चौघुले, राजेश भोसले, उदय नेने, मानसी कुलकर्णी ते चॉकलेट बॉय अनिकेत विश्वासराव हे त्यांचे प्रतिभावान शिष्य. स्वप्ननिल जयकर सारखे आघाडीचे दिग्दर्शक तर योगेश जोशी सारखे नावाजलेले लेखक (यादी खूपच मोठी आहे), या सर्वांसाठी विश्वास सोहोनी गुरुस्थानी.

माझा देखील नाट्य सृष्टीशी सम्बन्ध आला तो विश्वास मुळेच. त्यामुळे या नाट्य महोत्सवाला *विश्वास सोहोनी नाट्य महोत्सव* हेच एकमेव नाव आहे.

तर, नक्की या. विश्वास सोहोनी नाट्य महोत्सव बघायला.
रंगदेवतेला अभिवादन.
आपला

सचिन देसाई

लिमये काका

लिमये काकांच्या घराची परिस्थिती तशी साधारणच होती. आई गृहिणी, तिला लिहीता - वाचता येत नव्हते. वडील मात्र सिव्हिल इंजिनियर आणि PWD मध्ये नोकरीला होते. काकांना एक धाकटा भाऊ. काका साधारणत: दोन एक वर्षाचे असताना त्यांच्या डोळ्याला ट्रायकोमा नावाचा एक गंभीर आजार झाला,आणि अनेक महीने त्यांना डोळे उघडता येईनात. डॉक्टरांनी आशा सोडली होती आणि काका परत कधीच बघू शकणार नाहीत अशी परिस्थिती होती. शेवटी शेवटचा उपाय म्हणून तुळजापूरला देवीच्या पायावर नेऊन घातले, आणि आश्चर्य म्हणजे काकांना बघता येऊ लागलं. त्या प्रसंगाविषयी कळल्यावर ल्हानपणापासूनच काकांच्या मनात देवाविषयी गाढ श्रद्धा निर्माण झाली. वडलांची सतत बदली होत असल्यामुळे काकांना वयाच्या १० व्या वर्षापर्यँत शाळेत जाता आलं नाही, मात्र वडलांकडून गणित, शास्त्र, इंग्रजी आणि टायपिंग ह्या गोष्टी ते घरीच शिकत होते. त्याचसोबत रामविजय, हरिपाठ, हरिविजय ह्यासारखी धार्मिक पुस्तकंसुद्धा ते आवडीने वाचत. अखेर वयाच्या १० व्या वर्षी वडलांची बीडला बदली झाल्यावर ते इयत्ता ५ वी मध्ये शाळेत प्रवेश घेतला आणि त्यांचे शिक्षण सुरू झाले. वडील PWD सारख्या खात्यात असले तरी अतिशय स्वच्छ आणि प्रामाणिक होते, त्याचा परिणाम म्हणून त्यांना लौकर निवृत्ती घ्यावी लागली. जेंव्हा औरंगाबादला घर विकत घ्यायचं होत तेंव्हा आजीचे दागिने गहाण ठेऊन घर विकत घेतलं. महीना 100 रुपये पेन्शनमध्ये दोन मुलांचं शिक्षण, बहिणीचं लग्न हे करता येणं शक्य नव्हतं, त्यामुळे त्यांनी अन्य कामं करायला सुरुवात केली. दोन्ही मुलांनी मेहनत घेऊन मेडिकल आणि इंजिनियरींगला स्कॉलरशिप मिळाली. काकांना त्यांच्या वडलांकडून प्रामाणिकपणाच बाळकडू मिळालं तर आईने दोन महत्वाच्या गोष्टी सांगितल्या "समोर येईल ते खाव आणि पडेल ते काम करावं" ह्या दोन गोष्टी अंगी बाणवल्यामुळे त्यांना पुढे खूप फायदा झाला.

शाळा संपल्यावर त्यांनी औरंगाबाद मेडिकलला प्रवेश घेतला आणि शिक्षण पूर्ण केलं. सुरुवातीचे 6-8 महीने कॉलेजला ते रोज चालत गेले कारण सायकल घ्यायला पैसे नव्हते. Schooling in adversity is not such a bad thing अस त्यांना वाटतं. आपल्या त्यावेळच्या परिस्थितीमुळे आज जे मिळतंय किंवा जे मिळत गेलं त्याची कायम जाण राहीली आणि त्यासोबतच स्वभावात एक लवचिकपणा आला, आणि कशामुळे काही अडलं नाही.

कॉलेजच्या आठवणी सांगताना त्यांनी आपल्या शिक्षकांची आवर्जून आठवण काढली. "आमच्या वेळचे शिक्षक अतिशय आपुलकीने आणि प्रेमाने शिकवणारे होते. जर कुठल्या शिक्षकाला काही शंका अथवा प्रश्न विचारले तर कधीही न चिडता, न रागावता समजावत. कधी कधी आम्ही प्रोफेसरांच्या घरी जायचो आणि ते आम्हाला प्रेमाने खाऊ पिऊ घालून, जे काही अडलं आहे

ते समजावून द्यायचे. They were great clinicians". त्यावेळी आजच्या इतकी तंत्र आणि मशिन्स उपलब्ध नव्हती त्यामुळे रोग्याला नीट तपासून अचूक रोगनिदान(diagnosis) होणं गरजेचं असायचं. पेशंटला पूर्ण बरा करणे ह्यासाठीच त्यांची तळमळ असायची". त्यावेळचे एक प्रोफेसर डॉक्टर भागवत ह्यांना काका आपले गुरू मानतात. असे शिक्षक जवळून पाहिलयामुळे अर्थातच काकांच्या मनावरही तसेच संस्कार झाले. 1964 साली काका एमबीबीएस झाले आणि औरंगाबाद मेडिकल कॉलेज मध्येच रजिस्ट्रार म्हणून नोकरीला लागले. 1967 साली त्यांनी एम डी केलं. एमडी करताना त्यांना मिळालेले मार्क अनेक वर्ष कुणी मिळवू शकला नाही.

त्यानंतर ते लेक्चरर झाले आणि 1971 पर्यंत लेक्चरर होते. १९६८ साली काकांचं लग्न झालं. शोभामावशी औरंगाबाद मेडिकलच्याच विद्यार्थिनी होत्या. काका कॉलेजमध्ये रजिस्ट्रार असताना त्यांनी काकूंना शिकवलं होतं. १९७१ साली काका काकूंना कन्यारत्न झालं . त्याकाळात अनेक डॉकटर अमेरिकेला जात असत त्यामुळे काकांनी सुद्धा त्यादृष्टीने प्रयत्न सुरू केले. त्याचवेळी अजून एक पर्याय लक्षात आला तो म्हणजे इंग्लडला जाऊन मग तिथून अमेरिकेच्या पात्रता पूर्ण करून अमेरिकेला जायचं. त्यानुसार सर्व सोपस्कार आणि पात्रताअटी पूर्ण केल्या. सुदैवाने इथून नोकरीचे जे अर्ज केले होते त्यातल्या एकाला होकारार्थी उत्तर आलं आणि १९७१ साली काका इंग्लंडला गेले. सहा महिन्यांनी काकू लहानग्या विद्याला घेऊन इंग्लडला पोचल्या आणि संसार सुरू झाला. इंग्लंडला काका-काकूंना दुसर कन्यारत्न झालं. इंग्लडमध्ये काकांनी दोन अडीच वर्ष काम केलं. मूळ प्लॅननुसार अमेरिकेत जाण्याचे प्रयत्न चालूच होते. उत्तम प्रकारे अमेरिकन पात्रता-परीक्षा पास झाले. मात्र अमेरिकेतून येणाऱ्या सर्व संध्या इंटर्न म्हणून येत होत्या . आपल्या क्षेत्रात इतकी वर्ष काम केल्यावर इंटर्न म्हणून जायला काका तयार नव्हते. ज्या डॉक्टरने मावशींची डिलिव्हरी केली होती तो त्यांचा शेजारी होता आणि तो ऑस्ट्रेलियन होता, त्याने सुचवलं,"अरे तू ऑस्ट्रेलियाला का जात नाहीस? सकाळी गेलास तर दुपारी नोकरी मिळेल." मग त्याच्याच रेफ्रन्सनी काकांनी प्रयत्न सुरू केला आणि लौकरच त्यांना क्वीन एलिझाबेथ हॉस्पिटलकडून नोकरीची ऑफ्र आली. हॉस्पिटलने त्यांना स्पॉन्सरही केले आणि काका-काकू आपल्या दोन्ही मुलींसोबत १९७४ साली ऍडलेड ला आले.

ऑस्ट्रेलियाचा बेत अचानक जरी झाला तरी काकांना ती परमेश्वराची कृपा वाटते, कारण त्यांच्या मते ऑस्ट्रेलिया खूप उत्तम देश आहे आणि राहायला ऍडलेडसारखं शहर नाही. मुलींना उत्तम शिक्षण मिळालं, जीवनाचा आणि कामाचा आनंद घेता आला. त्यावेळचं ऍडलेड अजूनच साधं आणि लहान होत.लेट नाईट शॉपिंग, संडे शॉपिंग हे प्रकार नव्हते. पब ६ ला बंद व्हायचे आणि शनिवारी साडे अकराला दुकान बंद व्हायची. इंडियन किराणा माल विकणारी दुकान नव्हती का इंडियन हॉटेल्स नव्हती. जवळ जवळ सगळं साडे पाच ला बंद व्हायचं. सेंट्रल मार्केटमध्ये "अथेन्स" नावाचं एक ग्रीक दुकान आहे तिथे डाळी, तांदूळ आणि थोडे मसाले मिळायचे. इथे आल्यावर सुहास जतकर हा एकच मित्र होता. त्याने आपल्या घरी नेलं, सीटनमध्ये भाड्याचं घर शोधायला मदत केली. काका-काकू नुकतेच इंग्लण्डवरून आले होते त्यामुळे त्यांच्याकडे सामान असं फार काही नव्हतं. तिथे शेजारी एक इटालियन कुटुंब होतं. भाड्याच्या घरात राहायला गेल्यावर २ एक तासांनी शेजारीण हजर, म्हणाली," तुमच्याकडे एक बाळ आहे असं दिसलं, तुमच्याकडे तर हीटर वगैरे काही नाही तर हा हीटर आणि ब्लँकेट द्या. " अशीच एक ग्रीक बाई जवळ राहायची, मुलींच्या शाळेमुळे तिच्याशी ओळख झाली होती, घरी जाण-येण व्हायच. एकदा दिवाळीच्या दिवशी ती आली होती आणि दिवाळी बाबत गप्पा चालू होत्या. काकांनी तिला पाचही दिवसाची माहिती दिली. त्यावेळी तिने काकांना ते भाऊबीज कशी साजरी करणार असं विचारलं. बहीण इथे नाही त्यामुळे साजरी करता येणार नाही असं सांगितल्यावर ती म्हणाली, "मग मी तुझी बहीण". तेंव्हापासून गेली अनेक वर्ष काका आपल्या ग्रीक बहिणीकडे (तीच दु:खंड निधन होईपर्यंत) भाऊबीज साजरी करायला जात.

नोकरीत काही वर्ष गेल्यावर काकांनी हॉस्पिटलकडे स्वतंत्र प्रॅक्टिस करण्याबाबत विचारणा केली आणि हॉस्पिटलची परवानगी मिळाल्यावर सॉलिसबरीजवळ एका फिजीशीयनच्या रूम मध्ये एक पार्टिशन टाकून प्रॅक्टिस सुरू केली. दोन चार वर्षांनी जवळच्या एका हॉस्पिटलची सीईओ त्यांच्या प्रॅक्टिससाठी एक स्वतंत्र केबिन देऊ केली, कालांतराने अजून एका हॉस्पिटलकडून

ऑफर आली, अशा रीतीने एकट्याने सुरू केलेली त्यांची प्रॅक्टिस 16 कार्डिओलॉजिस्टपर्यंत वाढली. इथल्या मेडिकल क्षेत्रातील लोकांचा प्रामाणिकपणा आणि लोकांना सर्वतोपरी मदत करायची वृत्ती त्यांना आवडली.

हळूहळू इथे जम बसल्यावर एक गोष्ट प्रामुख्याने लक्षात आली ती म्हणजे येथील भारतीयांना धार्मिक बाबीत येणारी अडचण. त्यावेळी इथे देऊळ नव्हतं, कुणाकडे काही कार्य असेल तर पूजा सांगणार कोण? असा प्रश्न येऊ लागला.त्यातच एका स्नेह्याच्या वडिलांचं ते ऑस्ट्रेलियात असतानाच दु: खद निधन झालं, त्यावेळी त्यांचे अंत्यविधी करायची वेळ आली, त्यातून काका ह्या गोष्टी शिकत गेले आणि पौरोहित्य करू लागले. आपला अभ्यास वाढवून नव-नवीन गोष्टी शिकायला लागले. हळूहळू काही तरुण मुलं त्यांच्या ह्या उपक्रमात सहभागी झाली. एकेकाळी दोन बस भरून मुले काकांकडे रुद्र, अथर्वशीर्ष इ. शिकायला येऊ लागली आणि त्यातल्या अनेकांशी दृढ ऋणानुबंध जुळले ते अजूनही टिकून आहेत. त्यांच्याकडे शिकायल्या येणार्यात एक ऑस्ट्रेलियन बाई आहे जी अस्खलित अथर्वशीर्ष म्हणते, गुरुगीता गाऊन म्हणते. अशा प्रकारे काकांचे उपक्रम वाढत गेले. त्यांनी ऑस्ट्रेलियात विविध शहरात मिळून तीस एक लग्न लावली आहेत. काकांची ज्या तरुण मुलांसोबत नाळ जुळली होती त्यातल्या काही जणांची लग्न लावली आहेत. ह्याशिवाय भारत आणि अमेरिकेत सुद्धा २-२ लग्न लावली आहेत.अनेक वर्ष अभ्यास करून, वाचन करून गोळा केलेला ठेवा काका त्यांच्याकडे शिकायला येणाऱ्या सर्वांना वाटतात.शिकवताना नीट आणि सार्थ(अर्थासह) शिकवणे त्यांना महत्वाचं वाटतं. आत्तापर्यंत अनेक पोथ्या पुराणांचा अभ्यास करून ते जे शिकले त्याचं सार सांगताना ते म्हणाले की,"देवाची भीती बाळगू नये, देव खूप प्रेमळ आहे. आपल्याला देव कुठल्याही रूपात पाहण्याची मुभा आहे, त्यामुळे आपल्याला भावतो त्या रूपात देव पाहावा आणि पूजावा. देव देवळातच असतो अस नाही तर देव सगळीकडे आहे. To see him everywhere and treat everything as sacred. त्यामुळेच आपण सर्वांशी नीट वागावं, आपल्या मनात सर्वांविषयी आदरयुक्त प्रेम असावं ही खरी देवाची उपासना. त्याचसोबत आपल्या मनात कुणाविषयीही वाईट विचार येऊ नयेत ह्याचा प्रयत्न करावा." काकांनी देवाच्या उपासनेबाबत एक इंग्रजी लेख लिहीलाआहे, जो ह्या अंकात पुढे आपण छापला आहे.

देव-धर्म आणि उपासना हा विषय आल्यावर काकांच्या घरचा गणपती उत्सवाबाबत बोलणं ओघानेच आले. काकांच आजोळ कर्नाटक मधील रामदुर्ग. आजोबा 5 दिवसाचा गणपती बसवायचे. तिथे गणपतीत घराला रंग लावायचा प्रघात. रंग म्हणजे काय तर बलदाचे दगड असायचे ते उगाळून घरात रंग लावायचा. औरंगाबादला आल्यावर काकांच्या वडिलांनी गणपती बसवायला सुरुवात केली. काकांच्या दोन्ही मुली अनुक्रमे संकष्टी आणि अंगारकीला जन्माला आल्या आहेत, त्यामुळे काका काकूंची गणपतीवर खूप श्रद्धा आहे. 1984 पासून काका काकूंकडे गणपती उत्सव साजरा होऊ लागला. काकांचा मित्र परिवार काका काकूंसोबत उत्सव साजरा करायला झटत असतो. काकांच्या गणपती उत्सवाचे अजून एक वैशिष्ट्य म्हणजे अतिशय सुंदर सजावट आणि देखावे. दोन अतिशय उत्तम कलाकारांनी हे देखावे बनवले आहेत. सुरुवातीला एक दोन नव्हे तर तब्बल 17 वर्षे एक जर्मन कलाकार काकांकडे गणपतीची सजावट करत होता. भारतीय संस्कृती, देव देवता ह्याच्याबाबत कसलीही माहिती नसणारा हा कलाकार दरवर्षी 2-3 महिने झटून गणपतीची आरास करायचा. त्यांच्यानंतर श्री. सुनील नाईक ह्यांनी लिमये काकांकडील गणपतीच्या सजावटीची धुरा सांभाळली. मागची 7-8 वर्ष श्री. सुनील नाईक ह्यांनी सुंदर देखावे सादर केले आहेत.

[काकां काकूंनी त्यांच्याकडचे काही जुने फोटो आम्हाला प्रकाशित करायला दिले त्याबद्दल त्यांचे मनापासून आभार.]

नवीन येणाऱ्या लोकांनी आपली संस्कृती आवर्जून जपली पाहीजे असं त्यांना वाटतं. ऑस्ट्रेलियात त्याला उत्तेजन देतात, त्यामुळे आपल्या संस्कृतीला जपणं इथे शक्य आहे. पूर्वी त्यांनी मुलांना मराठी घरीच शिकवलं, पण आज आपल्याकडे मराठी शाळा आहे. त्यामुळे आशा उपलब्ध सोयी वापरून आपली संस्कृती, आपल्या परंपरा जपावं. तुमची कुठेतरी श्रद्धा असणं महत्वाचं आहे कारण त्यामुळे कठीण प्रसंगात मार्ग काढायचं मानसिक बळ येतं. ह्यासोबतच एकमेकांना धरून राहणं, एकमेकांना मदत करणं फार आवश्यक आहे. आपण चांगलं वागून, चांगलं राहून जवळीक निर्माण केली की

मार्ग सुखकर होतो. ह्यासोबतच, एक उत्तम नागरिक असं सुद्धा खूप आवश्यक आहे. आपल्या वागणुकीने आपल्या देशाचं आणि देशाच्या लोकांचं नांव उज्जवल करावं. इथे भेदभाव केला जात नाही, कर्तृत्वाला संध्या असतात त्यामुळे भरपूर मेहेनत करून मोठं व्हावं. जसजस आपलं इथे बस्तान बसत जात आणि रुळत जातो तसतसा समाजाला काही परत देण्यावर भर द्यावा. इथेसुद्धा अनेक सामाजिक संस्था आहेत त्यांचे उपक्रम आहेत त्यात आपला सहभाग द्यावा. रक्तदान, मुलांचे शिक्षण स्पॉन्सर करणे, शाळेला मदत असे अनेक मार्ग आहेत ते अवश्य करावं.

लिमये काकांनी इतक्या वर्षात केलेल्या वैद्यकीय आणि सांस्कृतिक क्षेत्रातील भरीव योगदानाबद्दल ह्या वर्षी OAM (ऑर्डर ऑफ ऑस्ट्रेलिया मेडल) ह्या नागरी सन्मानाने त्यांचा बहुमान केला आहे. आता काही दिवसातच एप्रिलमध्ये त्यांना तो पुरस्कार दिला जाणार आहे. ह्या बहुमानाबद्दल काकांचे मन:पूर्वक अभिनंदन आणि त्यांना व त्यांच्या कुटूंबियांना दीर्घायुष्य व आरोग्य लाभो ही ईश्वरचरणी प्रार्थना.

लिमये काकांकडील गणेशोत्सवातील काही आठवणी



LORD GANESHA AT SYDNEY